दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे
*(आठवी) वर्षा * शुक्रवार, १६ ऑक्टोबर २०२६ *वर्ष ४ थे *अंक २५३ *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

अत्याचार करत पैसे हिसकावल्याच्या गुन्ह्यात आरोपीला १० वर्षे सश्रम कारावास

हिंगणघाट : अत्याचार आणि जबरीने पैसे व मोबाईल हिसकावून घेतल्याच्या गुन्ह्यातील आरोपीला हिंगणघाट येथील सत्र न्यायालयाने १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. अंकुश ऊर्फ सोम्या महादेव सलामे (वय ३६, रा. सावली सास्ताबाद, ता. जि. वर्धा) असे शिक्षा ठोठावलेल्या आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने आरोपीला पाच हजार रुपयांचा दंडही ठोठावला असून, दंड न भरल्यास तीन महिने अतिरिक्त सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडितेला आरोपीने वर्धा येथे सोडून देण्यासाठी सांगून दुचाकीवर नेले. त्यानंतर रस्त्यालगतच्या नाल्यातील गवतात नेऊन जबरदस्तीने मद्य पाजून मारहाण केली. तसेच तिच्याजवळ जबरदस्तीने अत्याचार केला. यानंतर पीडितेचा मोबाईल आणि दोन हजार रुपये जबरीने हिसकावून घेतले. याप्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलिस निरीक्षक विजय नाईक यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता दीपक वैद्य यांनी कामकाज पाहिले. पैरवी अंमलदार रंजना झिलपे यांनी साक्षीदारांना न्यायालयात उपस्थित ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळी पूर्वी पाच हजार रुपये जमा करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आणखी चाळीस तालुक्यांचा दुष्काळी यादीत समावेश, परीक्षा शुल्क सरसकट माफ होणार



पिण्याचे पाणी, चाऱ्याची उपलब्धतेबाबत नियोजन; शेतकऱ्यांकडून वसुली नको : बँकांना निर्देश

मुंबई: राज्यातील आणखी चाळीस तालुके दुष्काळी म्हणून जाहीर करतानाच, या गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांना आगामी दिवाळीच्या तोंडावर दिलासा म्हणून त्यांच्या खात्यावर पाच हजार रुपयांचा अग्रीम जमा करण्याचा निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

शेतकऱ्यांकडून कर्ज वसुलीसाठी कुटल्याही प्रकारचा तगादा लावण्यात येऊ नये, अशी सक्त ताकीद संबंधित सोसायट्यांपासून, जिल्हा बँका, राष्ट्रीयकृत बँका आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांना दिल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी पाण्याच्या अवैध उपस्थावर कठोर कारवाईचे निर्देश दिल्याचे आणि त्यासाठी सोळा हजार वीज जोडण्या तोडण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

राज्यात यापुर्वीच २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यामध्ये आता आणखी ४० तालुक्यांचा समावेश करण्यात येत आहे. आता दुष्काळी तालुक्यांची संख्या ३०५ इतकी झाली आहे. या तालुक्यांमध्ये आता दुष्काळी उपाय योजना करण्यास प्राधन्य देण्यात येणार आहे. यापुर्वीच्या समाविष्ट तालुक्यांध्ये दुष्काकाळाबाबत ट्रिगर एक लागू केला होता. आता नव्याने समाविष्ट तालुक्यांसह, या तालुक्यांमध्ये ट्रिगर लागू करण्याबाबतची कार्यवाहीला गती देण्यात येत आहे.

दुष्काळी तालुक्यातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क कोणतेही निकष न लावता सरसकट माफ करण्याचे निर्देश देण्यात आल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी एका प्रश्नावर स्पष्ट केले.

जनावरांसाठी चारा उपलब्ध व्हावा यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत उपाययोजनांची चर्चा करण्यात आली. तसेच चाऱ्याच्या उपलब्धतेबाबत सर्वंकष आढावा घेण्यात आला. जिथे पाणी आहे, तिथे चाऱ्यांसाठीच्या पिकांची लागवड करण्यात यावी. तसेच रब्बीमध्येही ज्वारीसारख्या चारा देणारी पिके घेण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी सूचना करण्यात आली आहे. जनावरांसाठी चारा उपलब्ध व्हावा यासाठी शेतकऱ्यांकडून लागवड करण्यात आलेल्या चाऱ्याची शासन हमी भावाने खरेदी करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

कर्ज वसुलीसाठी शेतकऱ्यांकडे तगादा लावू नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यात शेतीसाठी साडेसात अश्वशक्तीपर्यंत वीज पुरवठा मोफतच आहे. यातूनही वीज बिलासाठी कुणी तगादा लावत असेल, तर त्यांना तसे न करण्याबाबत सक्त सूचना देण्यात येतील. कर्ज वसुलीसाठीही शेतकऱ्यांना तगादा लावू नये, असे निर्देश सोसायट्या आणि जिल्हा बँकांना देण्यात आल्या आहेत. मायक्रो फायनान्स कंपन्यांवरही लक्ष ठेवण्यात येत असून, त्यांनीही आततायी पणा करू नये असा स्पष्ट सूचना देण्यात आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

कृषिपंपांच्या सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण प्रत्येक जिल्ह्यात 'मिशन मोड'वर



नागपूर : दुष्काळी परिस्थितीत राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात १ हजार नवीन वितरण रोहित्र व 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' तसेच 'कॅपेसिटर बँक' खरेदीसाठी जिल्हानिहाय २० कोटींच्या निधीस मंजुरी दिली आहे. या सर्व कामांची युद्धपातळीवर अंमलबजावणी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सोमवारी (दि. १२) सर्व जिल्ह्यांचा आढावा घेतला आणि ही सर्व कामे 'मिशन मोड'वर पूर्ण करण्याचे आदेश दिले.

मुंबई येथील 'प्रकाशगड' मुख्यालयात आयोजित बैठकींमध्ये अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी प्रत्येक जिल्ह्यातील सर्व प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके बुधवार (दि. १४) पर्यंत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्याचे आदेश दिले. या निधीमधून होणाऱ्या वीजवहनाच्या सक्षमीकरणाच्या कामात कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही तसेच नादुरुस्त किंवा बंद पडलेले रोहित्र तातडीने बदलण्यात यावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी संचालक श्री. धनंजय औंढेकर (संचालन), श्री. अनुदीप दिघे (वित्त), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), श्री. सचिन तालेवार (प्रकल्प), श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांच्यासह कार्यकारी संचालक तसेच सर्व क्षेत्रीय मुख्य अभियंते व अधीक्षक अभियंते उपस्थित होते.

मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य शासनाने कृषिपंपांना आणि कृषी वीजवाहिन्यांवरील घरगुती ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी २० कोटींचा विशेष निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून आवश्यकतेनुसार विद्यमान ६३ केव्हीएऐवजी १०० केव्हीए क्षमतेचे तसेच अतिरिक्त सिंगल पोल रोहित्र उभारण्यात येणार आहे. यासोबतच कृषी वाहिनीवरील घरगुती ग्राहकांना २४ तास वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी 'स्पेशल डिझाईन रोहित्रे' (एसडीटी) बसविण्यात येणार आहेत. तर योग्य दाबाने व सुरळीत वीजपुरवठ्यासाठी उपकेंद्रांमध्ये आणि वीजवाहिन्यांवर आवश्यकतेनुसार नवीन कपॅसिटर बँक्स बसविण्यात येणार आहेत.

विशेष निधीमधील सर्व प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके संबंधित अधीक्षक अभियंत्यांनी दि. १४ ऑक्टोबरपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करावेत. दुष्काळी परिस्थितीत रोहित्र बिघाड व इतर तातडीच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी २४ तास सुरु असणारी स्वतंत्र हेल्पलाईन सुरू करण्याचे निर्देश यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी दिले.

वर्ध्येच्या मैदानात रंगणार क्रिकेट प्रीमियर लीग सीझन ०७

(१७,१८ ऑक्टोबरला होणार खेळाडूंची चाचणी)

वर्धा : जिल्ह्यातील वरीष्ठ क्रिकेट खेळाडूच्या वतीने वर्धा प्रीमिअर क्रिकेट लीगचे आयोजन करण्यात येत आहे . शहरासह ग्रामीण भागातील प्रतिभावान खेळाडूंच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे .यासाठी आयोजित हे सामने वर्धा प्रीमिअर लीगच्या धर्तीवर खेळविले जाणार आहे . सदर सामने रामनगर येथील सर्कस मैदानात क्रिकेट सामने खेळवले जाणार आहे .या स्पर्धेला ०४ डिसेंबर पासून सुरवात होईल तरी त्यामध्ये सहभागी होण्यासाठी नोंदणी फॉर्म भरणे आवश्यक आहे व चाचणी देणे पण आवश्यक आहे. खेळाडू हा वर्धा लोकसभा क्षेत्रातील असणे आवश्यक आहे. वर्धा येथील सर्कस मैदानात साखळी पद्धतीने एकूण ५५ सामने खेळविले जाणार आहेत. यात सहभागी होण्यासाठी कमिटी मेंबर महेश झाटे ,वैभव कवडे , प्रतीक राऊत ,अजय पहाडे,सौरभ इंगोले ,निलेश नाले ,राजेश पवार ,भरत पाटील,निखिल चौधरी,शिवम काळे,अमित थूल, निखिल कवडे,गोलू कोकाटे ,स्वप्नील चौहान,गजानन राऊत,गोलू इंगोले,विशाल नातं,शैलेश कुरसंगे,आशिष केचे स्वप्नील,लोकेश नरुले,अनिकेत देवगिरकर, तन्मय सातदेव. यांच्याशी संपर्क करावा असे आयोजकांनी कळविले आहे.

प्रतिभावंतांना संधी

वर्धा जिल्ह्यातील क्रिकेट खेळाडूंच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी ही स्पर्धा घेण्यात येत आहे.या सामन्याच्या रूपाने चांगली मोठी संधी चालून येणार आणि त्यांचा गुणांना प्रोत्साहन म्हणून भेट वस्तू पण देण्यात येणार आहे.याचा माध्यमातून खेळाडूंना क्रिकेट खेळाचे नवनवीन तंत्र सुद्धा माहीत होणार आहे.

घराचे कुलूप तोडून अतिक्रमण

वर्धा : न्यायालयाच्या आदेशान्वये घरास कुलूप लावण्यात आले. मात्र त्या घराचे लॉक तोडून गृहअतिक्रमण केल्याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

वडगाव (कला) येथील घर महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लिमीटेडचे पैसे न भरल्याने कोर्टाच्या आदेशान्वये सिल करण्यात आले. मात्र राधा बाबाराव पांडरे, विकास पंधराम यानी कोर्टाच्या आदेशाची अवहेलना करत घराचे लॉक तोडून गृह अतिक्रमण केले. याप्रकरणी बँकेचे विधी अधिकारी नयन वाघमारे यांच्या तक्रारीवरून राधा बाबाराव पांडरे, विकास पंधराम या दोन जणांविरोधात सेलू पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

कंत्राटदारांची दिवाळी अंधारात! १० टक्के निधी वाटपामुळे कंत्राटदारांमध्ये तीव्र नाराजी

वर्धा : सार्वजनिक बांधकाम विभागासह विविध शासकीय विभागांत कामे करणाऱ्या कंत्राटदारांची देयके वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याने कंत्राटदार आर्थिक संकटात सापडले आहेत. दसरा-दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळातही शासनाकडून अत्यल्प निधीचे वाटप करण्यात आल्याने कंत्राटदारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रलंबित देयके तातडीने अदा करावीत आणि निधी वाटपात पारदर्शकता आणावी, या मागण्यांसाठी कंत्राटदार संघटनेने दसऱ्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

वर्धा आणि आर्वीतील कंत्राटदार आर्थिक संकटात कंत्राटदारांच्या म्हणण्यानुसार, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत वर्धा येथे दोन वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या एएमसी (रिंग) कामांच्या देयकांसाठी १ कोटी २६ लाख रुपये, तर आर्वी सार्वजनिक बांधकाम विभागासाठी ७० लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र, निधी उपलब्ध होऊनही दीड महिन्यापर्यंत कंत्राटदारांची देयके अदा करण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. अनेक लहान कंत्राटदारांची अंतिम देयकेदेखील अद्याप मंजूर झालेली नाहीत.

काही कंत्राटदारांना केवळ ३० ते ४० हजार रुपये, तर काहींना ७० हजार रुपयांपर्यंतच रक्कम मिळाल्याने सिमेंट, बांधकाम साहित्य आणि मजुरांची देणी कशी द्यायची, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. तीन वर्षांपासून अनेक कंत्राटदारांची देयके प्रलंबित असल्याचा दावाही संघटनेकडून करण्यात आला आहे.

टक्केवारीच्या आरोपांमुळे प्रशासनावर प्रश्नचिन्ह

विकासकामे पूर्ण करूनही वेळेवर पैसे मिळत नसल्याने कंत्राटदारांना कर्जाचा आधार घ्यावा लागत आहे. शासनाकडून निधी उपलब्ध नसतानाही मोठ्या प्रमाणावर विकासकामांच्या निविदा काढल्या जात असल्याने या प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

निधी वाटपात कथित १० टक्के कमिशनखोरी होत असल्याचा आरोप कंत्राटदारांकडून करण्यात येत आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत चौकशी होऊन वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे.

अधीक्षक अभियंता सोनाली चव्हाण यांना निधीची परिस्थिती माहिती असतानाही निधीची उपलब्धता नसलेल्या कामांच्या निविदा काढण्यास परवानगी कशी देण्यात आली, याची चौकशी करण्याची मागणीही संघटनेने केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका आणि निविदा प्रक्रियेची तपासणी करण्याची मागणी करण्यात येत आहे.

मागण्या मान्य न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

जलजीवन मिशनसह विविध विभागांची देयके प्रलंबित

जलजीवन मिशन, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि इतर बांधकाम विभागांत कामे केलेल्या कंत्राटदारांनाही निधीअभावी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सांगण्यात येत आहे. दसरा-दिवाळीसारख्या महत्त्वाच्या सणांच्या काळातही देयके मिळत नसल्याने लहान-मोठ्या कंत्राटदारांमध्ये असंतोष वाढला आहे.

कंत्राटदारांच्या म्हणण्यानुसार, आर्थिक ताण आणि प्रलंबित देयकांच्या समस्येमुळे नऊ कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याचा गंभीर दावाही करण्यात आला आहे. या दाव्याची स्वतंत्रपणे पडताळणी होणे आवश्यक आहे.

कंत्राटदार संघटनेच्या प्रमुख मागण्या

१. निधीची तरतूद असल्याशिवाय नवीन कामांच्या निविदा काढण्यात येऊ नयेत.

२. निविदांमध्ये विशिष्ट कंत्राटदारांना फायदा होईल अशा अटी व शर्ती टाकण्यात येऊ नयेत.

३. राजकीय दबावाखाली निविदांचे वाटप करण्यात येऊ नये.

बंद पाणीपुरवठा योजना तातडीने सुरू करा; टँकरचा पर्याय शेवटी वापरा – मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दुष्काळसंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक; दुष्काळी उपाययोजनांचे जिल्हानिहाय प्रस्ताव १५ दिवसांत मागविण्याचे निर्देशआशा प्रशिक्षण सभागृह



मुंबई : राज्यातील काही दुष्काळी तालुक्यांत प्रलंबित वीजबिलांमुळे किंवा ट्रान्सफॉर्मरअभावी बंद असलेल्या पाणीपुरवठा योजना तातडीने सुरू कराव्यात. जिल्हाधिकाऱ्यांकडून जिल्हानिहाय उपाययोजनांचे प्रस्ताव येत्या १५ दिवसांत मागवून ते मुख्यमंत्र्यांकडे सादर करण्याची कार्यवाही करावी. पिण्याच्या पाण्यासाठी टँकर हा शेवटचा पर्याय ठेवून त्यापूर्वी अन्य सर्व उपाययोजना पडताळून पाहाव्यात, असे निर्देश महसूल मंत्री तथा दुष्काळसंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे दुष्काळसंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मंत्री बावनकुळे यांनी विविध विभागांच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. प्रलंबित वीजबिलांसाठी संबंधित जिल्ह्यांनी पंधराव्या वित्त आयोगातून उपलब्ध होणारा निधी वापरावा. अन्य जिल्ह्यांना एकरकमी तडजोड योजनेच्या माध्यमातून प्रलंबित वीजबिले भरण्याची कार्यवाही करण्यासाठी निर्देश द्यावेत. ज्याठिकाणी ट्रान्सफॉर्मरअभावी पाणीपुरवठा योजना बंद आहेत, तेथे ऊर्जा विभागाने ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून द्यावेत. यापूर्वी कार्यान्वित असलेल्या योजनांचा वीजपुरवठा पूर्ववत करून त्या पुन्हा सुरू करण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

पिण्याच्या पाण्याची स्थिती गंभीर होण्यापूर्वी पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पाणी उपलब्ध असलेल्या विहिरी अधिग्रहित कराव्यात. ७५ ते ८० टक्के काम पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजना प्राधान्याने पूर्ण कराव्यात. नादुरुस्त हातपंपांची तातडीने दुरुस्ती करावी आणि पाण्याचे स्रोत बळकट करण्यावर भर द्यावा. शिवाय पाण्याचे टँकर सुरू करण्यापूर्वी पाणीपुरवठा योग्य आणि सुरळित होण्यासाठी टँकर ऐप आणि जीपीएस प्रणाली सुरू करावी. मुख्य सचिवांनी जिल्हाधिकाऱ्यांची ऑनलाइन बैठक घेऊन त्यांना याबाबत मार्गदर्शन करावे, असेही मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

राज्यातील सध्याची स्थिती लक्षात घेता डिसेंबरपर्यंत चारा छावण्या उभारण्याची परिस्थिती उद्भवणार नाही. मात्र, जिल्हाधिकारी परिस्थितीचे सर्वेक्षण करून चाऱ्याची तातडीची गरज भासू शकणाऱ्या जिल्ह्यांमध्ये कमी कालावधीत तयार होणाऱ्या चाऱ्याची लागवड करावी. कमी दर असणाऱ्या चारा पिकांची लागवड करण्यास प्रवृत्त करून चारा पिकांसाठी दर जाहीर करावेत. चाऱ्याची गरज आणि उपलब्धता निश्चित करून जिल्हानिहाय उत्पादनाचे उद्दिष्ट ठरवावे व त्यानुसार आदेश द्यावेत, असे निर्देश मंत्री बावनकुळे यांनी दिले.

चारा नियोजनाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देऊन त्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करावी. या व्यवस्थेत कृषी विभागाने कार्यकारी विभाग म्हणून काम पाहावे, तर पशुसंवर्धन विभागाने कामांवर देखरेख ठेवावी. या दोन्ही विभागांनी ग्रामविकास विभागाच्या यंत्रणेसह संबंधित सर्व विभागांच्या समन्वयातून एका आठवड्यात प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करावी. चारा लागवडीपासून वितरणापर्यंतचे संपूर्ण नियोजन या कार्यपद्धतीत समाविष्ट करावे.

अतिरिक्त चारा उपलब्ध असलेल्या जिल्ह्यांतून जवळच्या जिल्ह्यांना चारा पुरविण्याचे नियोजन करावे. वन विभागाच्या तसेच पाणीस्रोतांजवळील गाळाच्या जमिनीवर चारा लागवडीचे नियोजन करावे. चारा उत्पादनासाठी बचत गटांना जागा उपलब्ध करून देण्याबाबतही विचार करावा, अशा सूचना मंत्री बावनकुळे यांनी केल्या.

जलसंधारणाच्या कामांना गती देण्यासाठी राज्यात सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांमध्ये जवळच्या पाणीस्रोतांमधील मुरूम वापरावा. त्यासाठी रस्त्यांलगतच्या पाणीस्रोतांची निश्चिती करावी. तलावांमधील गाळ काढणे आणि दुरुस्तीची कामे यांचा प्राधान्यक्रम ठरवून गाळ काढण्यासाठी मत्स्य व्यवसाय विभागाची मदत घ्यावी. विविध कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीचा दुष्काळी उपाययोजनांसाठी उपयोग करण्याच्या दृष्टीने मुख्य सचिवांनी संबंधितांची बैठक घ्यावी, असे निर्देश मंत्री बावनकुळे यांनी दिले.

मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, राज्यातील पाण्याची स्थिती गंभीर होण्यापूर्वी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होणे आवश्यक आहे. प्रलंबित वीज बिले भरून योजना सुरू कराव्यात. शेतकऱ्यांना चारा, पाणी आणि धान्याचा पुरवठा होण्यासाठी प्रयत्न करावेत. मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, राज्यातील कृषी अधिकाऱ्यांना गावागावातील चारा, पाण्याची पुरेपूर माहिती असते. त्यांच्याकडून पाणी घेवून संकलित केल्यास याचाही फायदा होईल. मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यामध्ये भात पीक आणि इतर चारा उपलब्ध आहे. हा चारा शेजारच्या जिल्ह्यात पुरवठा करण्याबाबत विचार व्हावा.

राज्यात जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दुष्काळी कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत आदेश काढले जातील, असे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सांगितले. कृषी विभागाचे दुष्काळसंदर्भातील सर्व पंचनामे येत्या काही दिवसांत पूर्ण होतील. त्यानंतर अंतिम स्थिती स्पष्ट होऊन केंद्र शासनाला दुष्काळ निधीबाबतचा अंतिम प्रस्ताव ऑक्टोबर अखेर तयार होईल, अशी माहिती मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव विनिता वेद सिंघल यांनी दिली. राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये ट्रिगर-१ आणि ट्रिगर-२ मधील कोणते निकष लागू होतात, याबाबतचे सर्वेक्षण सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री ?ड. आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, पाणीपुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटिया, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, पशुसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामास्वामी, ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार आदी उपस्थित होते.

संपादकीय



सौदी अरबच्या तेल साम्राज्याच्या नाड्या 'हुती'च्या हाती!



सध्या जागतिक युद्धात अनेक देश एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. यापैकी काही देशांतील वैभाव हा आजचा नसून, याआधीचे उद्दे काढण्याची संधी म्हणूनही या युद्धाकडे ते बघत आहेत. सौदी आणि हुती यांच्यातील युद्ध हे ही असेच! या युद्धाच्या सद्यस्थितीचा आणि त्याच्या परिणामांचा आढावा घेणारा हा लेख...

सौदी अरबची राजधानी रियाध येथील किंग खालिद विमानतळावर, दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी येमेनच्या अन्सार अल्ला हुतींनी भीषण हल्ला केला. या हल्ल्यात भारत, बांगलादेश, अमेरिका आणि सौदी अरबसह, अन्य देशांचे १३ नागरिक मारले गेले. ३००हून अधिक लोक जखमी झाले. अनेक जखमींची प्रकृती चिंताजनक आहे. त्यापूर्वी, दि. ६ ऑक्टोबर रोजी जिझान आणि नाझरान विमानतळांवर हल्ले झाले. दि. ७ ऑक्टोबर रोजी किंग खालिद आणि नभा आंतरराष्ट्रीय विमानतळ, दि. ८ ऑक्टोबर रोजी किंग खालिद विमानतळ, तसेच दि. ११ ऑक्टोबर रोजी किंग खालिद आणि दमाम विमानतळांवर हल्ला झाला.

अमेरिका आणि इराण यांच्यामध्ये दि. २८ फेब्रुवारीपासून सुरू असलेल्या युद्धामध्ये, होर्मुझच्या सामुद्रधुनीची नाकाबंदी करण्यात आली. अमेरिका इराणच्या तेलवाहू जहाजांना आखाताबाहेर पडू देत नाही, तर इराण आखाती देशांच्या तेलवाहू जहाजांवर हल्ले करत असल्याने त्यांच्याही तेलाची वाहतूक मोठ्या प्रमाणावर प्रभावित झाली. हे युद्ध सुरू होण्यापूर्वी सौदी अरबचे रोजचे तेल उत्पादन १ कोटी बॅरल इतके होते. ते होर्मुझच्या सामुद्रधुनीतूनच निर्यात केले जाई. होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाली असता, सौदी अरबने आपल्या पूर्व-पश्चिम तेलवाहिनीद्वारे आपले खनिजतेल, तांबड्या समुद्रातील यानबू बंदरापर्यंत आणण्यास प्रारंभ केला. या वाहिनीची दैनंदिन क्षमता ७० लाख बॅरल असली, तरी यानबू बंदरातील साठवणूक आणि व्यापारी मर्यादांमुळे, सौदी अरब दररोज सुमारे ४० लाख बॅरल तेलाची निर्यात करत होता.

तांबड्या समुद्राला अरबी समुद्राशी जोडणारी बाब 'एल मंडप' सामुद्रधुनीवर 'हुती'नी कब्जा केल्यावर, त्यांनी सौदी अरबच्या तेलवाहू जहाजांना तांबडा समुद्र ओलांडण्यास मनाई केली. त्यामुळे सौदी अरबचा तेलपुरवठा प्रभावित झाला. आता सौदी अरब अमेरिकेच्या मदतीने, आपल्या तेलवाहू टँकरमधून खनिजतेल ओमानजवळच्या समुद्रात छोट्या जहाजांवर चढवून ते परिषायच्या आखाताबाहेर पाठवत आहे. असे करण्याने तेलवाहतुकीचा खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला असून, जगभरात तेलवाहू जहाजांचा तुटवडा जाणवत आहे.

येमेनला हजारो वर्षांचा इतिहास आहे. येमेनच्या उत्तर भागात राहणाऱ्या 'शिया'पंथीय 'झैदी इस्लाम'चे अनुसरण करणाऱ्या 'हुती'ना स्वतःची वेगळी ओळख आहे. २०व्या शतकाच्या सुरुवातीला येमेनचे राज्य, आजच्या येमेनच्या उत्तर भागातील पर्वतीय आणि पठारी प्रदेशात होते. आजचा दक्षिण येमेन, तसेच संपूर्ण अरबस्तानामध्ये विविध अरब टोळ्यांचे राज्य होते. १९०२ मध्ये इब्न सौदेने रियाधवर विजय मिळवला. १९२५ मध्ये त्याने नज्द आणि हेजाज प्रांतांवर ताबा मिळवला. त्यांचा मुलगा अब्दुल अझिझ इब्न सौद याने, १९३२ साली सौदी अरब या देशाची घोषणा केली. त्याला ब्रिटन आणि अमेरिकेने पाठिंबा दिल्याने, तसेच आधुनिक शस्त्रास्त्रे पुरवल्याने सौदी अरब आणि येमेनमधील सीमावादात सौदीची सरशी झाली. असे असले, तरी येमेनचा सौदीच्या जिझान आणि नाझरान प्रांतांवरील दावा कायम राहिला. उत्तर येमेनमधील 'हुती' हे 'शिया' असले, तरी १९७८ ते २०१२ पर्यंत येमेनवर 'सुन्नी' असलेल्या अली अब्दुल्ला सालेह यांचेच सरकार होते.

अरब राज्यक्रांत्यांच्या लाटेत येमेनमध्ये सालेह यांना राजीनामा द्यावा लागला होता, त्यांची जागा अब्द रब्बु मन्सुर हादी यांनी घेतली. २०१४ मध्ये 'शिया'पंथीय 'हुती'नी हादी सरकार उलथवून, राजधानी सना आणि आजूबाजूच्या प्रदेशांवर ताबा मिळवला. सौदी अरब आणि येमेन यांच्यामध्ये, सुमारे १ हजार ३०७ किमीची सीमारेषा आहे. येमेनमध्ये इराण समर्थित सरकार आल्यास आपली सुरक्षाव्यवस्था धोयात येईल, या भीतीपोटी सौदीचे युवराज महंमद बिन सलमान यांनी संयुक्त अरब अमिरातीं आणि अन्य आखाती अरब राष्ट्रांसह या युद्धात उडी घेतली. अमेरिकेकडून मिळालेली अत्याधुनिक विमाने आणि क्षेपणास्त्रांनी येमेन उद्धवस्त करुनही, त्यांना 'हुती'चा पराभव करता आलेला नाही. 'हुती'ची इराणशी जवळीक असली, तरी ते इराणची 'प्यादी' म्हणून लढत नव्हते. डोनाल्ड ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात अमेरिकेने 'हुती'ना दहशतवादी संघटना घोषित केल्याने, ते इराणच्या जवळ ओढले गेले. प्रादेशिक महासत्ता होण्याचे स्वप्न असलेल्या इराणनेही, आफ्रिकेच्या मागनि तस्करी करून 'हुती'ना शस्त्रास्त्रे पुरवण्यास प्रारंभ केला. २०१४ पासून चालू असलेल्या या युद्धामध्ये एक लाखांहून अधिक लोक मारले गेले, तर अडीच लाखांहून अधिक लोकांना आणि मुलांना कुपोषण आणि आजारपणामुळे जीव गमवावा लागला आहे. 'हुती'कडे आधुनिक शस्त्रे नसली, तरी इराणकडून इंजेन आणि क्षेपणास्त्रे तंत्रज्ञान मिळवून त्यांनी शेकडो किमी अंतरावरील सौदी तेल शुद्धीकरण प्रकल्पांवर हल्ले करण्यास सुरुवात केली.

ग्रामीण महिला: समान संधी, संसाधने आणि निर्णय घेण्यास प्रोत्साहन !!

आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिन सप्ताह.

आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिन दरवर्षी १५ ऑक्टोबरला साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश ग्रामीण भागातील महिलांच्या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेणे आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी जागरूकता वाढवणे आहे. ग्रामीण महिला शेती, अन्न उत्पादन, कुटुंबाचे पालनपोषण आणि पर्यावरण संवर्धन यासारख्या क्षेत्रांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. ग्रामीण महिलांच्या परिश्रमांमुळे ग्रामजातील असमुरक्षा, शाश्वत विकास, आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण होते. तरीसुद्धा, त्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो, जसे की शिक्षणाची कमतरता, आरोग्य सेवा आणि आर्थिक संसाधनांचा अभाव.

हा दिवस महिलांच्या हक्कांची जाणीव करून देतो आणि त्यांना समान संधी, संसाधने आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत भाग घेण्याचे प्रोत्साहन देतो. ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणामुळे केवळ त्यांचे जीवनच सुधारत नाही, तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठीही हे महत्त्वाचे ठरते. आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिन त्यांच्यावर केंद्रित कार्यक्रम आणि चर्चा आयोजित करून, महिलांच्या योगदानाला मान्यता देतो आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना सुचवतो. ग्रामीण महिला या भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेतीचा कणा मानल्या जातात. त्या कुटुंब आणि समाजाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. ग्रामीण महिलांचे महत्त्व आणि योगदान: ? शेती आणि पशुपालन: ग्रामीण भागातील महिला शेतातील मशागत, पेरणी, कापणी आणि पशुपालनाची कामे मोठ्या प्रमाणात करतात. ? ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा: कुटुंबाचा गाडा हाकण्यासोबतच स्वानिक नैसर्गिक साधनांचा आधारित उपजीविका चालवण्यात त्यांचा मोठा वाटा असतो. ? पर्यावरण संवर्धन: 'पाणी अडवा, पाणी जिरवा' सारख्या उपक्रमांद्वारे जलसंधारण आणि पर्यावरण रक्षणात त्या पुढाकार घेत आहेत. ? वनत गट आणि स्वयंसहायता: महिला बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण, लघुउद्योग आणि सामूहिक शेतीचे प्रयोग यशस्वी झाले आहेत.

प्रमुख आव्हाने: इ१.कमी मोबदला: भरपूर कष्ट करूनही पुरुषांच्या तुलनेत त्यांना मिळणारा मोबदला किंवा वेतन कमी असते. इ२. शिक्षणाचा अभाव: ग्रामीण भागात उच्च शिक्षणाचे प्रमाण अद्यापही कमी आहे आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे शिक्षण्याची संधी मिळणे कठीण होते. इ३. आरोग्य आणि सुरक्षितता: आरोग्याविषयी अपुरी जनजागृती आणि संसाधनांची कमतरता यामुळे अडचणी येतात. शासकीय योजना व उपक्रम : ? राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मिशन (?उ): महिलांना बचत गटांद्वारे एकत्र आणून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले जाते. ? राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना: महाराष्ट्र शासनातर्फे ग्रामीण महिलांच्या आर्थिक प्रगतीसाठी राबवली जाणारी योजना. ? राष्ट्रीय महिला शेतकरी दिन: महिला शेतकऱ्यांचे योगदान ओळखण्यासाठी दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी हा दिन साजरा केला जातो. विचार: 'स्मार्ट ग्रामीण स्त्री' एकविसाव्या शतकातील ग्रामीण भागातील विचारांपर्यंत आता शहरी भागातील सुधारणेचे वारे पोहोचलेले आहेत. पूर्वीच्या मानाने आज खेडी बऱ्याच प्रमाणात सुधारली आहेत. ग्रामीण भागातील स्त्री आता शेतीची कामे पुर्वीप्रमाणेच पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून करते आहे. मात्र हे कष्ट करताना ती आता शेतात आधुनिक यंत्र-साधनांचा वापर करू लागली आहे. शेतीची साधने स्वतः आनंदाने व हिमतीने चालवत आहे. बागायतींचा काने नवीन औषधांची माहिती घेऊन, माती परीक्षण करून शेतीची कामे करते आहे. जनावरांना चारा घालण्यासाठी असो किंवा गायी-म्हशींचे दूध काढणे असो.. या सर्व कामांसाठी यंत्रांचा वापर करू लागली आहे. फक्त शहरी भागातील स्त्रिया कामावर जाण्यासाठी शहरांकडे धाव घेत आहेत. तर खेड्यातील स्त्रिया शहरांकडे जाण्यासाठी गाडीचा वापर करू लागल्या आहेत. शहरी भागातील स्त्रिया कामावर जाण्यासाठी गाडी वापरतात असे नाही, तर खेड्यातील स्त्रियाही शेताला जाण्यासाठी गाडीचा वापर करू लागल्या आहेत. शेतीतील गवताचे भारे डोक्यावर न उचलता गाडीचा वापर करून गवताचे भारे उचलून आणते. आजची ग्रामीण भागातील स्त्रीसुद्धा स्मार्ट झाली आहे. ती स्मार्ट वर्क करते आहे. महात्मा गांधीजींनी म्हटले होते, 'खेड्याकडे चला, भारत हा खेड्यांचा देश आहे.' खरंच भारत देशातील सर्व खेडी जर सुधारली तर देश सुधारायला वेळ लागणार नाही. भारत हा विकसन शीलयेवजी विकसित राष्ट्र म्हणून उदयाला येईल. ग्रामीण भागात आता बऱ्याच अंशी प्रत्येक घरात सुधारणा झाली आहे. गॅस, वीज, विवेवर चालणारी उपकरणे आता या ग्रामीण घरांमध्ये दिसून येत आहेत. खेड्यातील घरांची रचनासुद्धा शहरातील घरप्रमाणे सुधारलेली दिसतेय. रस्ते पाणीपुरवठा, वीज, दूरध्वनी, प्रमाणबनी यासारख्या गोष्टी अद्ययावत झालेल्या आहेत. शिक्षणाच्या बाबतीतही ग्रामीण भागात बरोच सुधारणा झाली आहे. आजची मातापालक सुशिक्षित आहे. ती आपल्या मुलांच्या अभ्यासाकडे, आरोग्याकडे जातीने लक्ष घालते आहे. याचे दूरगय परिणाम आपणपहाते आहोत. सर्व परीक्षांमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी दूरे येत आहेत. याशिवाय आहेत. आजी-पणाजीच्या काळात दळण दळण्यासाठी जाते वापरले जायचे. बाटण्यासाठीटोचा, उखळ, खलवले यांचा वापर होई. तसेच स्वयंपाकघरात चूल वापरली जाई. याचा वापर पुन्हा आपल्या आईच्या काळात थोडा बदलेलेला दिसून आला. पण आताच्या पिढीत त्याचा वापर फक्त लग्नकार्यात पूजा करण्यासाठीच केला जातोय. आता सर्वत्र सुतीची जागा गॅस, रॉकेटी यांनी घेतलीय. खलबत्त्याच्या जागी मिक्सर, उपकरण आले आहे. जात्याच्या ठिकाणी गिरणी आली आहे. जगभरातील ग्रामीण विकासात ग्रामीण महिला महत्त्वाची भूमिका बजावतात -- जेव्हा त्यांना आर्थिक संधी आणि सुविधा मिळतात, तेव्हा त्या पायाभूत सुविधा आणि सामुदायिक कल्याणामध्ये गुंतवणूक करून आपल्या समाजाचे परिवर्तन घडवून आणतात.तिसवांना पुरुषांप्रमाणे जमिनीची समान मालकी मिळत नसल्यामुळे त्यांना अनेकदा भेदभावाला सामोरे जावे लागते. असमान लिंग भूमिका किंवा भेदभावामुळे, त्यांच्या कमाईचा बहुतांश भागथेट त्यांच्यानिर्वगणारा राहतनाही.ग्रामीण महिलांना सक्षम केल्याने केवळ वैयक्तिक महिला आणि कुटुंबांची गरिबी कमी होण्यायास मदत होतनाही, तर संपूर्ण समाजाला सक्षम बनवून शिक्षण, रोजगार आणि ग्रामीण विकासाच्या इतर लाभांपर्यंत पोहोचण्यात बदल घडवता येतो . हे ओळखून, आंतरराष्ट्रीय समुदाय अनेकदा आंतरराष्ट्रीय विकासाची दरिद्रचे दरवर्ता, जी ग्रामीण महिलांच्या जीवनावरील गुंतवणूक आणि पण्णाबांचा मागोवा घेतात, आणि संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिनाचे आयोजन करते.

कृषी समुदायांमध्ये भूमिका: हा विषाग 'शेतीमधील लिंग भूमिका' या पुस्तकातील एक उतारा आहे. ऐतिहासिक दृष्टया, शेतीमध्ये सहभागी होताना महिलांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागला आहे, कारण पुरुषप्रधान समाजांनी कृषी समुदायांमधील महिलांना त्यांच्या स्वतःच्या श्रमावर किती स्वायत्तता आणि निर्बंध आहे यावर वारंवार मर्यादा घातल्या आहेत. तथापि, शेतीच्या स्वीकरणामुळे , महणजेच पुरुष शहरी नोकऱ्यांसाठी ग्रामीण भाग सोडून जाताना आणि अधिक महिला शेतीची कामे करण्यासाठी मागे राहतात, त्यामुळे शास्त्रज्ञांच्या अभ्यासाचा एक वारंवार येणारा विषय आहे. इतिहासकार देखील त्यांचा अभ्यास करतात, कारण ते कृषीप्रधान आणि अगदी औद्योगिक समाजांची सामाजिक रचना समजून घेण्यासाठी महत्त्वाचे आहेत . शेती उगभरात रोजगाराच्या अनेक संधी आणि उपजीविका प्रदान करते. हेलिंग असमानता आणि लिंगांमध्ये संसाधने आणि विशेषाधिकारांचे असमान वितरण देखील प्रतिबिंबित करू शकते. विशेषतः पशुपालक, बांशिक अल्पसंख्याक, आदिवासी आणि ग्रामीण महिलांना नैसर्गिक संसाधने, तांत्रिक उपकरणे आणि कृषी सेवा मिळवण्याचा आणि त्यावर निर्बंधण ठेवण्याचा प्रयत्न करताना अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागतो; तसेच, त्यांना निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सामील केले जात नाही. बहुतेक वेळा, अशा अडथळ्यांची मुळे भेदभावाच्या प्रथांमध्ये असतात, ज्या महिलांच्या स्वातंत्र्यावर खूप प्रभाव टाकतात. नेब्रास्का-लिंकन विद्यापीठाच्या कृषी आणि नैसर्गिक संसाधन संस्थेनुसार, स्त्रियांना पुरुषांपेक्षा जमीन, अवजारे आणि ज्ञान मिळवणे सहसा अधिक कठीण जाते, विशेषतः विकसनशील देशांमध्ये. अन्न आणि कृषी संघटना यांसारख्या अनेक संस्था आणि स्वतंत्र संशोधनाने असे दर्शविले आहे की लैंगिक सहकार्य वाढवल्याने समाजासाठी अधिक नफा आणि अन्न सुरक्षा मिळू शकते. सर्वसाधारणपणे, आर्थिक विकासाच्या खालच्या स्तरावर कृषी रोजगारात महिलांचा वाटा जास्त असतो, कारण अपूरे शिक्षण, मूलभूत पायाभूत सुविधा आणि बाजारपेठांमध्ये मर्यादित प्रवेश, जास्त बिनामोबदला कामाचा भार आणि शेतीबाहेरील ग्रामीण रोजगाराच्या संधींची कमतरता यामुळे महिलांच्या शेतीबाह्य कामाच्या संधींवर गंभीर मर्यादा येतात. अनेक उप-सहारा आफ्रिकन देशांमध्ये कृषी कामगार वर्गात महिलांचे प्रमाण५० टक्क्यांहून अधिक आहे. बेंगोडिया, लाओ पीपल्स डेमोक्रॅटिक रिपब्लिक आणि झिग्तनासह आग्नेय आशियातील अनेक देशांमध्ये कृषी क्षेत्रातील कामगार वर्गात सुमारे निम्मे महिला आहेत. शेती उत्पादनात काम करणाऱ्या महिला अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काम करतात. त्या सर्वात गरीब देशांमध्ये केंद्रित असतात, जिथे उपजीविकेसे पर्यायी मार्ग उपलब्ध नसतात आणि हवामानामुळे होणारे मोठे बदल आणि संघर्षांच्या परिस्थितीही त्यांच्या कामावरील तीव्रता कमान टेवतात. महिला उद्योजक आणि स्वतंत्र शेतकरी म्हणून सहभागी होण्याची शक्यता कमी असते आणि त्या कमी फायदेशीर पिकांच्या उत्पादनात गुंतलेल्या असतात. बहुतेवदा, महिला शेतीमध्येविनावेतन कौटुंबिक कामगार किंवा हंगामी कामगार असतात. सामाजिक रूढी देखील महिलांना पिके पिकवण्यापासून आणि पुरुषांचे वर्चस्व असलेल्या कामांमध्ये सहभागी होण्यापासून रोखू शकतात. समान आकाशच्या, महिला आणि पुरुषांद्वारे व्यवस्थापित शेतांमधील जमिनीच्या उत्पादकतेतील लैंगिक तफावत २४ टक्के आहे. सरासरी, कृषी क्षेत्रातील मजुरीच्या रोजगारात महिला पुरुषांपेक्षा १.४ टक्के कमी कमावतात; याचा अर्थ असा की पुरुषांनी कमावलेल्या प्रत्येक डॉलरमागे महिलांना ८२ सेंट मिळतात.

शेतीचे स्वीकरण :ह्राविभाग 'शेतीचे स्वीकरण' या पुस्तकातील एक उतारा आहे. स्वीवदी अर्थशास्त्रामध्ये शेतीचे स्त्रीकरण म्हणजे कृषी क्षेत्रात, विशेषतः विकसनशील जगात, महिलांच्या सहभागात झालेली मोजता येण्यायोगी वाढ होय. ही घटना सन १९६० च्या दशकात सुरू झाली आणि कालांतराने तिचा वाटा वाढत गेला. सन १९९० च्या दशकात, उदारीकरणाच्या काळात , ही घटना अधिक टळक झाली आणि ग्रामीण महिला लोकसंख्येवर त्याचे नकारात्मक परिणाम दिसू लागले त्यानंतर कृषी बाजारपेठा लिंग-आधारित असोशि बनल्या, ज्यामुळे पुरुष आणि महिलांवर वेगवेगळा परिणाम झाला. सन २००९ मध्ये, जागतिक बँक , एफाओ(ईंफ), आयएफएडी (ईंई) यांना असे आढळले की , पुरुष इतर क्षेत्रांमध्ये अन्न शोधण्यासाठी स्थलांतरित झाल्यामुळे, जगभरातील८० टक्क्यांहून अधिक ग्रामीण अल्पभूधारक शेतकरी महिला होत्या. संयुक्त राष्ट्रांना असे आढळले की, अन्न क्षेत्रातील सर्व महिलांपैकी ४५-८०३ महिला शेतीत काम करत होत्या. ही संख्या इतर घट-नांसाठी देखील लागू केली गेली आहे, ज्यामध्ये कृषी कार्यक्रमांमध्ये महिलांचा वाढता वाटा, ग्रामीण मागतून पुरुषांचे स्थलांतर, कृषी उत्पादकतेमध्ये महिलांच्या सेवी कमी होणे आणि कौशल्य वगळल्यामुळे ग्रामीण भागात कमी वेतन यांचा समावेश आहे. कार्यकर्त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की ही कल धोकादायक आहे आणि अन्न असुरक्षितताकडे नेतो.

गरिबी- ग्रामीण गरिबी: ग्रामीण महिला गरीब आणि महिला म्हणून विशेषतः वंचित आहेत. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांतील महिलांना त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांच्या तुलनेत गरिबीचा जास्त धोका आणि मर्यादित आर्थिक संधींचा सामना करावा लागतो. रोजा वीस वर्षांत अत्यंत गरिबीत जगणाऱ्या ग्रामीण महिलांची संख्या सुमारे ५० टक्क्यांनी वाढली आहे. ग्रामीण गरिबीतील महिला त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांपेक्षाही कठोर परिस्थितीत जगतात, परंतु त्यांना अतिरिक्त सांस्कृतिक आणि धोरणात्मक पूर्वाग्रहांचा सामना करावा लागतो, जे अनौपचारिक आणि उपलब्ध असल्यास औपचारिक क्षम बाजारात त्यांच्या कामाचे अवमूल्यन करतात. सन २००९ च्या जागतिक सर्वेक्षणात असे म्हटले आहे की 'महिला शेती आणि ग्रामीण उपजीविकेत विनावेतन कौटुंबिक कामगार, स्वतंत्र शेतकरी आणि मजुरीवर काम करणाऱ्या कामगार म्हणून सक्रिय भूमिका बजावतात, अनेकदा जमीन, कर्ज आणि इतर उत्पादक मालमत्ता उपलब्ध नसतानाही.' ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महिलांचे योगदान सामान्यतः कमी लेखले जाते, कारण महिला मोठ्या प्रमाणात काळजी घेण्याचे काम करतात जे आर्थिकदृष्ट्या उत्पादक मानले जात नसल्यामुळे अनेकदा दुर्लक्षित राहते. जरी काही राष्ट्रांमध्ये सांस्कृतिक आणि सामाजिक नियम महिलांना घराबाहेर काम करण्यापासून रोखतात, तरी इतर देशांमध्ये विशेषतः आफ्रिकेतील ग्रामीण समुदायांमध्ये महिला प्रमुख अन्न उत्पादक म्हणून काम करतात, ज्यामुळे कुटुंबांची अन्न आणि उत्पन्नाची सुरक्षा सुधारते, अत्यंत गरिबीतील कुटुंबे घरातील आणि घराबाहेरील दोन्ही कामांमध्ये महिलांच्या कामावर अधिक अवलंबून असतात, ज्यामुळे महिलांना जास्त वेळ काम करावे लागते आणि अधिक मेहनत करावी लागते. गरिबीचे स्वीकरण ही एक संकल्पना आहे जी शहरी आणि ग्रामीण दोन्ही ठिकाणी लागू होते. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिनाच्या समस्त माता-भगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

- संकलन व सुलेखन-
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे
गुरुजी,
(दिनविशेषकार)
रहा. श्रीगुरुदेव ग्रामोन्नतीर मंदिर अकुला,
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्स?प- ९४२३७१४८८३.

षष्ठम्दुर्गा ..

स्वर्ण वर्णा षष्ठम्दुर्गा
भगवती कात्यायनी
कात्यायन ऋषिगृही
जन्मे दानव घातिनी

चतुर्भुजा आदिशक्ती
झाली समर रागिणी
सिंहारूढा उग्र रूपा
असूरप्रति संहारिणी

साधका सांभाळ करे
भक्त प्रिया सुहासिनी
वसती अढळ स्थानी
भक्त मनी सिंहासनी

स्मेरमुखी शिवपत्नी
विजया पातु मालिनी
रौद्र रूप भक्ता नाही
दिसे सुरेख शालिनी

कंचनाभां तू वराभयं
परमानंदमयी योगिनी
विश्वचिन्ता विश्वातिता
विश्वप्रिता मनमोहिनी

अंशप्राप्त त्रयमूर्तीचा
देवता दानव घातिनी
धावते खल निग्रणार्थ
सार्थमहिषासुरमर्दिनी

आज्ञाचक्रे स्थित होई
मोक्ष पावती जोगिणी
वाम गुण गळून जाती
बनती तुझ्या योगिनी

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

तस्कर ..

क्रौर्य धंदा तेजीत
नारी बीज विक्रय
पांढरे नीच तस्कर
अधमाकुठले भय

रेट कार्डे महागडे
कमी ज्यांचे गं वय
स्त्रिचे जीवा धोका
तरीही नसे हयगय

सुंदर बीज दातीस
जादा छळी निर्दय
गोरखधंदा असल्या
पिळवटूटाके हृदय

कडक तपास हवा
कुणाचा हा आश्रय
कारवाई मुळापर्यंत
कसला मिळे संश्रय

इथेनको राजकारण
अति गांभिर्य विषय
रोखाया हवी बंदूक
जिथे जरासा संशय

उच्चशिक्षितसामील
देती राक्षसी परिचय
हे सफेदजॅकेट रॅकेट
करी पापांचा संचय

चौर्य कर्माचे बियाणे
नव्या पिढीचा प्रलय
नव्या जन्मास ग्रहण
कायम संशयी वलय

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

प्राण्यांची परिभाषा समजणारा सच्चा प्राणिमित्र काळाच्या पडद्याआड



मनुष्य आणि प्राणी संघर्ष अटळ आहे निसर्गाचा नाश मानवी हस्तक्षेप यामुळे प्राणी आणि मनुष्य संघर्ष दिवसेंदिवस दिसत आहे परंतु प्राण्यांची परिभाषा समजणारा सच्चा प्राणिमित्र दुःखद निधन झाले यामुळे परिसरात एकच चर्चा रंगली प्राण्यांची परिभाषा समजणारा सच्चा प्राणिमित्र जीवनाचा प्रवास थांबवला कराड तालुक्यातील शामगाव गावचे सुपुत्र दत्तात्रय पाटील नुकताच अपघाती निधन झाले प्रगतशील शेतकरी सच्चाप्राणी मित्र नावलौकिक होतादादा, तुम्ही म्हणजे 'कष्टत्व'. सतत कृतिशील. स्मितहास्य म्हणजे तुम्हाला मिळालेली दैवी देणंच. लहान असो की मोठा तुम्ही अद्वितीय प्रेम करुन माणुसकी जपली. तीच माणुसकी जपण्याचा आम्हालाही प्रयत्न करायचा आहे. तुम्ही ज्यांच्यावर हृदयांपासून प्रेम केले, तुमचं 'असणं' सदैव ज्यांच्या हृदयस्थ आहे, त्यांच्यासाठी... तुम्ही जसं जगासाठी जगलात, तसेच आम्हालाही जगायचं आहे.

जन्म, मृत्यू अटळ आहे. कोणालाही चुकणार नाही. अगदी तसाच मृत्यूचा फेरा दादा जीवनात आला. तो दिवस १३ ऑक्टोंबर २०२६ ज्या देहाने अगणित कष्ट उपसले. आपल्या कर्तबगारीने समाजाला भरभरुन दिले. कोणाच्या मनालाही दुखवले नाही. वेळप्रसंगी स्वतःचा खिस्सा रिकामा करुनही दुसऱ्याची ओंजळ भरली. आम्हाला अंगा-खांद्यावर खेळवले. मायेची उब दिली. शाबासकीची थाप दिली. घडविले. तो देह अखेरचा विसावला.

दादा तुम्ही म्हणजे कष्टत्व, तर आई म्हणजे देवत्व. बाप म्हणजे जगातील सगळ्यात मोठे आभाळ..., आई म्हणजे प्रेमाचा अथांग महासागर... दोघेही आम्हाला देहरुपाने सोडून गेले. पण, आम्ही पोरके झालो नाही, आणि होणार नाही. तुमचे गुण, कर्तृत्व, संस्कार आमच्यात उभे करुन गेलात. तुम्ही दोघांनी माणसांवर निरंतर प्रेम

दादा, तुमच्या रुपाने माणुसकी जपायचीयं

केले. शेकडो जणांना मायेची उब दिली. आजही तुमच्या आठवणींनी अनेकांच्या हृदयाला पान्हा फुटतो. म्हणूनच तर तुमचा वारसा पुढे चालवण्यासाठी आम्ही अटोकाट प्रयत्न करतोय. तुझ्या दोन्ही मुली तेजस्विनी वअनु तुझा विचाराचा वारसा पुढे नक्कीच चालवतील कुस्तीची परंपरा राज जपेल यात काही शंका नाहीईश्वर बडोलाच भावांचं कर्तव्य पार पाडेल तुझी मुलीबद्दलची विचार समाजाला आदर्श ठरतील तू म्हणत होतास की

लेक म्हणजे घराची श्रीमंती. लेक म्हणजे घराची संस्कृती. लेख म्हणजे असे चंदनाचे झाड जे माहेरी रुजते, बहरते, फुलते आणि सासर सुगंधीत करते. आपले माहेरचे नाव, त्याची प्रतिष्ठा सासरी सुखाचा संसार करून वाढवते. हा संसार करताना तिला आपल्या माहेरची माहेरच्या, नात्यांची पदोपदी आठवन येते.

लेक म्हणजे आई-वडिलांचा अभिमान. त्यांच्या काळजाचा तुकडा.ज्या माहेरी तिला फुलाप्रमाणे जपलेली असते सासरी ते सुख मिळणे तिच्यासाठी फार कठीण. कारण ती सासरी कोणाची तरी लेक म्हणून नव्हे तर बायको, सून, आई, वहिनी अशी जबाबदारीची नाती लिहून वावरणार असते. आणि यामध्ये तिलाच दुसऱ्यावर माया करायची असते. हे लेकीच्या आईने अनुभवलेले असते. म्हणून सासरी जाते लेकीला उद्देशून आई म्हणते,

सासऱ्या जाते लेकी
लेक डोळ्यांनी हाडी दूक
माहेराचा आणि सुख
लेकी इसार सासरात
लेक जन्म घेतेस परक्याचे धन म्हणून.

म्हणून भारतीय संस्कृतीत आपल्या लेकीचे लग्न हे प्रत्येक पालकांसाठी परम कर्तव्य असते. हे कर्तव्य पार पाडणे म्हणजे आयुष्यातील सगळ्यात मोठी जबाबदारी पार पाडणे असे प्रत्येक पित्याला वाटते. म्हणून ही जबाबदारी घरणी बाईच्या ओव्यातून येते

बाप्पान दिल्यो लेकी
लेकी देऊन जालो सुखी

पण म्हणतात ना मोठी होतात मुले, आई मोठी होत नाही तसेच कुटल्याही लेकीची आई तिच्या शेवटच्या श्वासापर्यंत आपल्या लेकीची चिंता करणे सोडत नाही. भले लेक कितीही सुखात असली तरीही. म्हणून बाप लेक सासरी पाठवून सुखी होतो पण आईला मात्र तिच्या म्हणण्या धुण्यापासून तिच्या सर्व सुखापर्यंत सगळ्याच गोष्टींचा घोर लागलेला असतो. आणि म्हणून घराची बाई आपल्या आईची चिंता आठवून म्हणते

माझे मातेला चिंता मोठी

लेखी बाईच्या म्हणण्याचीदादा शेवटी एवढेच सांगतो शरीराने तू आमच्यातून निघून गेलास मनाने तो आमच्यापासून दूर गेला नाही तुझा विचाराचा वारसा अखंडपणे आम्ही पुढे चालू ठेवू ईश्वर तुझ्या आत्म्यास शांती देवो

आई बापाच्या मागोमाग तिला आपल्या भावाची आठवण येते. तो भाऊ जो तिच्या सर्व इच्छा तत्पर पूर्ण करायचा. तो भाऊ मायेच्या सावलीला पोरका झाला तुझी विचाराची परंपरा अखंडपणे चालू ठेवीन यात काही शंका नाही तुझ्या आत्म्यास शांती लाभो हीच ईश्वरचरणी

प्रार्थना,,,

कंधार शहरात डेंग्यू, मलेरियाचा धोका वाढला

नाल्या तुंबल्या, घाणीचे साम्राज्य; नागरिकांचे आरोग्य धोक्यात, वंचित बहुजन आघाडीचा नगर परिषदेला इशारा



कंधार । संतोष कांबळे

कंधार शहरातील अनेक भागांत तुंबलेल्या नाल्या, साचलेले सांडपाणी आणि जागोजागी साचलेल्या कचऱ्यामुळे अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले आहे. परिणामी, डासांचा प्रादुर्भाव वाढून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. या गंभीर समस्येकडे नगर परिषद प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करीत वंचित बहुजन आघाडीचा वतीने शहरात तात्काळ धूरफवारणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात १३ ऑक्टोबर २०२६ रोजी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. वंचित बहुजन आघाडीने दिलेल्या निवेदनानुसार, कंधार शहरातील अनेक भागांमध्ये नाल्या तुंबल्या असून सांडपाणी रस्त्यावरून वाहत आहे. कचऱ्याचे ढीग गल्लोगल्ली साचले आहेत.रंगारगल्ली, दावलमलीक नगर, खाटीक गल्ली यांसह शहरातील अनेक भागांत गेल्या दोन महिन्यांपासून नाल्यांची स्वच्छता करण्यात आलेली नसल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

डासांचा वाढता प्रादुर्भाव; नागरिकांच्या आरोग्याशी खेळ नको!

शहरातील अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे.

शहरात तात्काळ धूरफवारणी करावी, नागरिकांना नियमित नालीसफाईची सुविधा उपलब्ध करून द्यावी, तसेच स्वच्छ आणि सुरक्षित पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

अन्यथा नगर परिषदेसमोर आंदोलनाचा इशारा

या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन नागरिकांना दिलासा न दिल्यास वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नगर परिषदेसमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे कंधार तालुका सचिव अहमद महेबूब पठाण यांनी हे निवेदन नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना सादर केले. निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांनाही देण्यात आल्या आहेत.

प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज

पावसाळ्यानंतर साचलेले पाणी, तुंबलेल्या नाल्या आणि अस्वच्छ परिसर हे डासांच्या उत्पत्तीस पोषक ठरू शकतात. त्यामुळे संभाव्य साथीचे आजार रोखण्यासाठी नियमित स्वच्छता, धूरफवारणी आणि जनजागृती या उपाययोजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या प्रश्नावर नगर परिषद प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

खडकवाडी येथे कडव्याच्या गंजीला अचानक आग लागून अंदाजे चाळीस हजार रुपये नुकसान



कैलास गायकवाड/ विशेष प्रतिनिधी

खडकवाडी ता.येथे शेतकरी नाथा बबन वाळूंज आणी देवराम बबन वाळूंज यांची कडब्याची गंजीला आज बुधवार दुपारी अचानक आग लागली. या परिसरात दुष्काळ असताना व जनावरांच्या खाद्य पुडील काही दिवसांमध्ये उत्पन्न होऊ शकणार नाही. या घटनेमुळे शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले. संपूर्ण गाव गोळा झाला. आग विजवण्याचा खूप प्रयत्न केला परंतु यश आले नाही. जनावरांना खाद्य काहीच उरले नाही. ग्रामस्थ नाथा आबाजी सुक्रे, उदय शेठ डोके, विश्वास सुक्रे, मच्छिंद्र

खडकवाडी येथे कडव्याच्या गंजीला अचानक आग लागून शेतकऱ्याचे मोठे नुकसान

देवराम वाळूंज, विशाल वाळूंज,बाबाजी ज्ञानेश्वर वाळूंज, संपत सुक्रे, एकनाथ सुक्रे ,श्रीराम वाळूंज, गुलाब वाळूंज, घरातील महिला मंडळी व पुरुषांनी, ग्रामस्थांनी शर्तीचे प्रयत्न केले परंतु आग विझवू शकले नाही त्यामुळे संपूर्ण कडबा जळून खाक झाला. माजी सरपंच आनिल डोके यांनी कामगार तलाठी अर्चना कोंडावळे मॅडम व पारगाव पोलिसांना या घटनेची खबर देऊन, पंचनामा केला आहे.

इमामवाडीच्या शहाजीनगरात घाणीचे साम्राज्य!

डेंग्यू, मलेरियाचा धोका वाढण्याची भीती; नागरिकांचे आरोग्य धोक्यात, ग्रामपंचायतीच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष



कंधार। संतोष कांबळे

कंधार तालुक्यातील इमामवाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या नवीन वसाहतीतील शहाजीनगर परिसरात अस्वच्छतेची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. रस्त्यांची अपुरी व्यवस्था, ठिकठिकाणी साचलेले सांडपाणी आणि मोकळ्या जागांमध्ये पडलेले कचऱ्याचे ढीग यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. या अस्वच्छतेमुळे दुर्गंधी पसरत असून डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून ग्रामपंचायतीच्या स्वच्छता व्यवस्थेबाबत रहिवाशांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

शहाजीनगर ही नवीन वसाहत असून परिसरात रस्त्यांची योग्य व्यवस्था नसल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यांच्या कडेला तसेच काही ठिकाणी रस्त्याच्या मधोमध सांडपाणी साचलेले दिसून येते. पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने घाण पाणी अनेक दिवस साचून राहण्याची शक्यता आहे. त्यातच मोकळ्या जागांमध्ये कचरा टाकला जात असल्याने संपूर्ण परिसरात अस्वच्छतेचे चित्र पाहायला मिळत आहे.

डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे डेंग्यू-मलेरियाची भीती

साचलेले पाणी आणि परिसरातील अस्वच्छता यामुळे डासांची उत्पत्ती वाढण्यास पोषक परिस्थिती निर्माण होऊ शकते. विशेषतः साचलेल्या स्वच्छ पाण्यात एडिस डासांची उत्पत्ती होऊन डेंग्यूचा धोका वाढू शकतो, तर काही प्रकारच्या डासांमुळे मलेरियाचाही प्रसार होऊ शकतो. त्यामुळे वेळीच स्वच्छता आणि डास निर्यंत्रणाचा उपाययोजना न केल्यास नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

ग्रामपंचायतीने तातडीने लक्ष देण्याची गरज

वसाहतीतील नागरिकांना स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण मिळणे ही स्थानिक प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. नियमित कचरा संकलन, सांडपाण्याचा योग्य निचरा, नाल्यांची स्वच्छता, डास प्रतिबंधक फवारणी आणि साचलेल्या पाण्याचे व्यवस्थापन याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. तसेच वसाहतीतील रस्त्यांची समस्या दूर करून नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.शहाजीनगरमधील अस्वच्छतेची समस्या तातडीने सोडवून ग्रामपंचायतीने प्रत्यक्ष पाहणी करावी आणि कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. संभाव्य आजारांचा प्रादुर्भाव होण्यापूर्वी वाट न पाहता प्रशासनाने वेळीच जागे व्हावे, अन्यथा नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.आता तरी ग्रामपंचायत प्रशासन शहाजीनगरमधील स्वच्छतेच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन नागरिकांना दिलासा देणार का? असा सवाल परिसरातील रहिवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

प्रसंगावधान आणि वैद्यकीय कौशल्यातून १८ वर्षीय तरुणाला जीवनदान; डॉ. धनंजय साबळे यांच्या कार्याचे कौतुक!

कैलास गायकवाड / विशेष प्रतिनिधी

निरगुडसर : संकटाच्या क्षणी दाखवलेले प्रसंगावधान आणि वेळेवर केलेले एई एखाद्याला जीवनदान देऊ शकते, याचा प्रत्यय निरगुडसर येथे आला.



मंचर येथील डॉर्डा. साबळे डायग्नोस्टिक्सचे सर्वेसर्वा रेडिओलॉजिस्ट डॉ. धनंजय साबळेडे हे पारगाव येथील ओम हॉस्पिटलमध्ये जात असताना निरगुडसर येथे त्यांच्या समोर दोन दुचाकींमध्ये अपघात झाला. या अपघातातील १८ वर्षीय तरुण त्यांच्या समोरच कोसळला.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून डॉ. साबळे यांनी तातडीने वाहन थांबवून तरुणाची तपासणी केली. त्यावेळी नाडी व करोटिड पल्स जाणवत नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी आपल्या सहाय्यकाच्या मदतीने एई सुरू केले. रुग्णवाहिका येईपर्यंत त्यांनी एई सुरू ठेवून तरुणाला मदत केली.

डॉ. साबळे यांच्या प्रसंगावधानामुळे आणि त्यांच्या सहाय्यकाच्या तत्पर सहकार्यामुळे या तरुणाला वेळेवर प्राथमिक जीवनरक्षक मदत मिळाली. त्यानंतर तरुणाला पारगाव येथील ओम हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. डॉसध्या हा तरुण ओम हॉस्पिटलमध्ये स्थिर असल्याची माहिती आहे.

विशेष म्हणजे, डॉ. साबळे हे रेडिओलॉजिस्ट असून त्यांचे मुख्य कार्य वैद्यकीय निदान करणे आहे. मात्र, आपल्या वैद्यकीय अनुभवाचा आणि ज्ञानाचा योग्य वेळी उपयोग करून त्यांनी माणुसकीचे दर्शन घडवले. संकटाच्या क्षणी केवळ बघ्याची भूमिका न घेता तातडीने मदतीसाठी पुढे येणे, हे त्यांच्या सेवाभावी वृत्तीचे दर्शन घडवते. ड'योग्य वेळी दिलेले एई हे जीवन आणि मृत्यू यांच्यातील महत्त्वाचा फरक ठरू शकते, 'ड याची जाणीव करून देणारी ही घटना आहे.

डॉ. धनंजय साबळे आणि त्यांच्या सहाय्यकाच्या या तत्पर, धाडसी व सेवाभावी कार्याचे सर्व स्तरांतून

मांडगाव येथे वाचन प्रेरणा दिवसाचे आयोजन

तालुका प्रतिनिधी / अमोल झाडे. समुद्रपूर: यशवंत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मांडगाव येथे डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवसाचे आयोजन करण्यात आले होते हा वाचन दिवस सन २०१७ पासून महाराष्ट्र शासनाने शिक्षण विभागात त्यांच्या जयंती निमित्त १५ ऑक्टोबरला साजरा करण्याचे ठरविण्यात आले होते तेव्हापासून या दिवसाला वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात येत आहे यावेळी दोन वर्गखोल्यात शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांनी सहभागी होवून बारा तास सकाळी सात ते सायंकाळी सात वाजेपर्यंत सतत वाचन करण्यात आले बारा तास वाचन करून एक वाचकांसमोर प्रेरणा निर्माण केली यावेळी उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे दैनीक जनप्रभात तालुका प्रतिनिधी व सहयोग मल्टिस्टेट क्रेडिट को ऑपरेटिव्ह बँक चे शाखा व्यवस्थापक अमोल झाडे लोकमत वार्ताहर दिगांबर तडस देशोन्नती नवराष्ट्र चे वार्ताहर प्रमोद बोरकर राजेश बाळासराफ प्रभारी मुख्याध्यापक व प्राचार्य तसेच शिक्षक कल्पना कामडी नरेश शेंडे पंकज दांडेकर रविंद्र मुटे राजेंद्र कोकाटे बंडूजी वाघ आणि गजानन मस्के बाबुजी आणि अभिजीत दवंडे यांच्या उपस्थित कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली होती कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शोभा सोनबने पुरुषोत्तम मंडलीक वीजय घुसे यांनी परिश्रम घेतले.

दुष्काळी परिस्थितीत रेशन कार्ड बंद करण्याची कारवाई स्थगित करा!

'मिशन सुधार' अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना धान्यापासून वंचित ठेवू नका; शिरूर तालुका रेशनिंग दुकानदार संघटनेची जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे मागणी

कवठे प्रतिनिधी / धनंजय साळवे



कवठे येमाई:ग्रामीण भागातील दुष्काळजन्य परिस्थिती, पाणीटंचाई, शेतीचे नुकसान आणि रोजगाराच्या अभावामुळे आर्थिक अडचणीचा सामना करणाऱ्या गरीब व गरजू कुटुंबांना दिलासा देण्यासाठी 'मिशन सुधार' अंतर्गत रेशन कार्ड बंद करण्याची कार्यवाही तात्पुरती स्थगित करावी, अशी मागणी शिरूर तालुका रेशनिंग दुकानदार संघटनेचे अध्यक्ष गणेश माधवराव रत्नपारखी यांनी केली आहे. यासंदर्भात यांनी पुरवठा विभाग जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे.

ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित शेती, शेतमजूरी आणि हंगामी रोजगारावर अवलंबून आहे. प्रतिकूल परिस्थितीमुळे उत्पन्नाचे स्रोत कमी होत असताना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत मिळणारे धान्य हे अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन ठरते. अशा परिस्थितीत रेशन कार्ड बंद करण्याची कार्यवाही करताना विशेष काळजी घेणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

'मिशन सुधार' अंतर्गत रेशन कार्ड बंद करण्याची कार्यवाही करताना पात्र लाभार्थ्यांची कार्डे चुकीने बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांची पात्रता, प्रत्यक्ष आर्थिक परिस्थिती, आवश्यक कागदपत्रे आणि शासकीय नोंदी यांची सखोल पडताळणी केल्याशिवाय कोणताही निर्णय घेऊ नये, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

गरजू कुटुंबांच्या अन्नसुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

दुष्काळसदृश परिस्थितीत ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, शेकडो वर्षांची परंपरा आहे. पटावरील डाव, हार-जीत, तोड करणे, कधी कधी डाव रंगात आला तर खेळ रात्र भर चालतो व कधी पहाट होते हे खेळणाऱ्या मंडळींना समजत नाही. हा खेळ खेळण्यासाठी नाथा आबाजी सुक्रे, सुरेश सुक्रे, शरद सहकारी बँकेचे संचालक अशोक आदक पाटील, बबनराव भोजने, एकनाथ सुक्रे, देवराम वाळूंज, डॉ. नाथा सुक्रे मधु सुक्रे, नथु सुक्रे, कांताराम भोजने, बाळासाहेब घुमाड, दत्तात्रय सुक्रे , नामदेव सुक्रे लहू डोके, संपत सुक्रे, गोरख पोखरकर पृथ्वीराज शिंदे, ज्ञानेश्वर सुक्रे, किरण सुक्रे, नामदेव सुक्रे, आणि कैलास सुक्रे,भीमराव अल्प उत्पन्न गटातील नागरिक आणि गरजू कुटुंबांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पाणीटंचाई आणि शेतीतील नुकसान यामुळे उत्पन्नावर परिणाम होत असताना त्यात धान्य दुकानातून मिळणारे धान्य बंद झाल्यास या कुटुंबांच्या अडचणी आणखी वाढू शकतात. त्यामुळे रेशन कार्ड बंद करण्याची प्रक्रिया राबविताना मानवी दृष्टिकोनातून तसेच शासनाच्या प्रचलित नियमांनुसार निर्णय घेणे गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

पडताळणीशिवाय कारवाई करू नये

रेशन कार्ड बंद करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या लाभार्थ्यांची कागदपत्रे आणि पात्रता यांची योग्य पडताळणी करण्यात यावी. कोणत्याही पात्र लाभार्थ्यांचे रेशन कार्ड चुकीने बंद होऊ नये आणि पात्र कुटुंबाला सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्यापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, रेशन कार्ड बंद करण्याची कार्यवाही करण्यापूर्वी संबंधित लाभार्थ्यांना आपली बाजू मांडण्याची आणि आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची संधी द्यावी. या प्रक्रियेत पारदर्शकता राखून नियमानुसार निर्णय घेण्यात यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रलंबित रक्कम तातडीने जमा करा; अन्यथा धान्य वितरण बंद करण्याचा दुकानदार संघटनेचा इशारा

कवठे प्रतिनिधी / धनंजय साळवे

कवठे येमाई :शिरूर शहर व तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांचे गेल्या तीन महिन्यांपासूनचे मार्जिन मनी प्रलंबित असल्याने दुकानदारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. सणासुदीच्या काळात आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने संबंधित विभागाने तातडीने थकीत रक्कम दुकानदारांच्या बँक खात्यांमध्ये जमा करावी, अशी मागणी शिरूर तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष गणेश माधवराव रत्नपारखी यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे यांच्याकडे केली आहे. शिरूर शहरासह संपूर्ण तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना शासनाकडून मिळणारे मार्जिन मनी गेल्या तीन महिन्यांपासून अद्याप प्राप्त झालेले नसल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे. स्वस्त धान्य दुकानदारांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत लाभार्थ्यांना धान्य वितरित करण्याचे काम करावे लागते. मात्र, या कामाच्या मोबदल्यापोटी मिळणारी रक्कम वेळेत जमा होत नसल्याने दुकानदारांसमोर आर्थिक अडचणी निर्माण होत असल्याचे सांगण्यात आले आहे.

सणासुदीच्या काळात आर्थिक अडचणी वाढल्या

सध्या सणासुदीचे दिवस सुरू असल्याने दुकानदारांच्या आर्थिक जबाबदाऱ्यांमध्ये वाढ झाली आहे. दुकानांचा दैनंदिन खर्च, वीजबिल, वाहतूक तसेच इतर आवश्यक खर्च भागवितांना दुकानदारांना आर्थिक नियोजन करावे लागत आहे. अशा परिस्थितीत सलग तीन महिन्यांचे मार्जिन मनी प्रलंबित राहिल्याने दुकानदारांवरील आर्थिक ताण वाढत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

शासनाकडून मिळणारा मोबदला वेळेवर जमा होणे आवश्यक असताना त्यास विलंब होत असल्याने दुकानदारांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. या प्रश्नाकडे संबंधित विभागाने गांभीर्याने लक्ष देऊन प्रलंबित रक्कम त्वरित अदा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

धान्य वितरण बंद करण्याचा इशारा

शिरूर शहर व तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानदारांचे गेल्या तीन महिन्यांपासूनचे प्रलंबित मार्जिन मनी तातडीने त्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा करण्यात यावे, अशी मागणी संघटनेने केली आहे. वारंवार मंत्रि जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे यांना निवेदन देऊन या प्रश्नावर त्वरित कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आली आहे.

प्रलंबित मार्जिन मनी तातडीने जमा न झाल्यास नाइलाजास्तव शिरूर शहर व तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना धान्य वितरण बंद करण्याचा निर्णय घ्यावा लागेल, असा स्पष्ट इशारा संघटनेने दिला आहे.

जानेवारी, फेब्रुवारी, मार्च महिन्यात गाळपासाठी येणाऱ्या उसाला जादा दर



कैलास गायकवाड / विशेष प्रतिनिधी

राज्यातील साखर कारखान्यांना प्रतिटन ३३५ रुपयांच्या निकषानुसार कर्ज देण्याचे राज्य सरकारने ठरविले आहे. या योजनेअंतर्गत भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याला सुमारे ३० कोटी रुपयांचे कर्ज मिळण्याची अपेक्षा आहे. त्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवाळीत पैसे देण्याचा मार्ग मोकळा होईल तसेच भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांत ऊस गाळपासाठी देणाऱ्या शेतकऱ्यांना जादा दर देण्याचे धोरण राबविण्यात येणार आहे, अशी ग्वाही भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक तसेच माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी सोमवारी (ता. १२) रोजी केली.

माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांची घोषणा

दत्तात्रयनगर-पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर कारखान्याचा २७ वा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ आणि गव्हाणपूजन वळसे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या वेळी , जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, लाला अर्बन बँकेचे अध्यक्ष युवराज बाणखेले, कृषी उत्पन्न बाजारसमितीचे सभापती निर्देश थोरात

व सभासद ऊस उत्पादक शेतकरी बहुसंख्येने हजर होते

कालावधी नुसार जाहीर केलेला दर पुढीलप्रमाणे

ऑक्टोबर ते डिसेंबरपर्यंत : एफआरपीनुसार ३,२७३ रुपये

जानेवारी : मूळ दर एफआरपी ३,२७३ रुपये -१०० रुपये जादा दर, एकूण ३,३७३

फेब्रुवारी : मूळ दर एफआरपी ३,२७३ रुपये ३ २०० रुपये जादा दर, ३,४७३ मार्च : मूळ दर एफआरपी ३,२७३ रुपये ३ ३०० रुपये

जादा दर -३,५७३ रुपये

समितीचे सभापती नीलेश थोरात, शिरूर बाजार समितीचे माजी सभापती प्रकाशराव पवार, भैरवनाथ पतसंस्थेचे उपाध्यक्ष सागर काजळे, तालुका खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष नवनाथ हुले, शेतमाल प्रक्रिया संस्थेचे अध्यक्ष सतीश रोडे पाटील, ज्येष्ठ नेते प्रतापराव वळसे पाटील, शिवाजीराव ढोबळे, कामगारनेते अँड. बाळासाहेब बाणखेले, कारखान्याचे कार्यकारी संचालक चंद्रकांत दरगे, सचिव रामनाथ हिंगे पाटील, कारखान्याचे संचालक, ऊस उत्पादक शेतकरी आणि विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील म्हणाले की, तालुक्यात ऊस कमी असल्यामुळे बाहेरील ऊसतोडणीला प्राधान्य दिले जाणार आहे. जवळील शेतकऱ्यांचा ऊस उशिरा गाळपासाठी घ्यावा लागण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कारखान्याने जादा दर देण्याचे धोरण आखले आहे. आंबेगाव तालुक्याचा दुष्काळी तालुक्यांचा यादीत समावेश व्हावा, यासाठी चर्चा सुरू असून, पुढील आठ ते पंधरा दिवसांत याबाबत घोषणा होण्याची अपेक्षा वळसे पाटील यांनी व्यक्त केली.

भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी प्रास्ताविकात या हंगामासाठी १० लाख टन ऊस गाळपाचे नियोजन करण्यात आले असून, आजूबाजूच्या किंवा उत्तर पुणे जिल्ह्यात कोणीही दिला नाही असा चांगला ३ हजार ५०० रुपये दर भीमाशंकर कारखान्याने दिल्याचे सांगितले. या वेळी माजी आमदार पोपटराव गावडे, सूर्यकांत पलांडे, विवेक वळसे पाटील, आदिनाथ महाराज जुन्नरकर, संतदास महाराज मनसुख, नवनाथ महाराज मारोरे अधिनी तहाई महाराज टाकरे आदींची भाषणे झाली. सूत्रसंचालन नीलेश पडवळ यांनी केले. उपाध्यक्ष अँड. प्रदीप वळसे पाटील यांनी आभार मानले.

खडकवाडीच्या भैरवनाथ मंदिरात महाभारतातील सोंगट्या व सारी - पाट



कैलास गायकवाड / विशेष प्रतिनिधी

खडकवाडी ताआंबेगाव येथील कुलदैवत, ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज देवस्थान खडकवाडी (लोणी धामणी) येथे सालाबाद प्रमाणे या वर्षी ही नवरात्र ऊस्तवाचे आयोजन ग्रामस्थ, मानकरी, गुरव, सालकरी व दागिनदार यांनी मोठ्या दिमाखात केले आहे. दहा दिवस सायंकाळी धूप आरती, ओलांड्या त्यानंतर भजन व पुराणांमध्ये वर्णन असलेला शिव पार्वती खेळत असलेला खेळ, सारिपाटाचा खेळ(सोंगट्या) येथे खेळला जातो, ह्या खेळाचे वर्णन महाभारतातही मिळते. ह्या खेळाला

विरोधकांना असंभव तर आमदार सुमित वानखेडे साठी सर्व काही संभव..!



'असंभव' काम करून दाखवले! आमदार सुमित वानखेडे यांच्या दणकट पाठपुराव्यामुळे कारंजा तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश

?कारंजावासीयांसाठी दिलासादायक बातमी; दुष्काळग्रस्त यादीत अखेर नाव झाले निश्चित!

कारंजा तालुक्याचा अखेर दुष्काळग्रस्त 'ट्रिगर-१' मध्ये समावेश; आमदार सुमित वानखेडे यांच्या पाठपुराव्याला यश!

राज्यातील खरीप हंगाम २०२६ मधील पर्जन्यमानातील तूट आणि इतर घटकांचा विचार करून महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३०५ तालुके अंतिम दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केले आहेत. यामध्ये कारंजा तालुक्याचा देखील अधिकृतपणे 'ट्रिगर-१' मध्ये समावेश करण्यात आला आहे. प्रशासकीय स्तरावरील काही तांत्रिक अडचणींमुळे सुरुवातीला कारंजा तालुक्याचा समावेश नव्हता, ज्यामुळे दुष्काळजन्य परिस्थितीच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण होते. मात्र, शेतकऱ्यांच्या या न्याय्य मागणीसाठी युवा आमदार सुमित वानखेडे यांनी शासन दरबारी सातत्याने जोरदार पाठपुरावा केला.

भूमिकेच्या बळावर हे 'असंभव' वाटणारे काम 'संभव' करून दाखवले आहे. प्रशासनावर मजबूत पकड असलेल्या आमदार वानखेडे यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा करून अखेर कारंजा तालुक्याला दुष्काळग्रस्त यादीत स्थान मिळवून दिले. त्यामुळे कारंजा तालुक्यातील शेतकरी व ग्रामीण जनतेला मोठा दिलासा मिळाला असून, सर्व स्तरांतून आमदार सुमित वानखेडे यांच्या या कामगिरीचे कौतुक होत आहे.

शेतकऱ्यांच्या या प्रश्नावर विरोधकांकडून करण्यात येणाऱ्या टीका-टिप्पणी आणि कथित नरेटिव्हला न जुमानता, आमदार सुमित वानखेडे यांनी आपल्या अभ्यासू आणि आक्रमक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संपूर्ण प्रकरणाची तातडीने व संवेदनशीलतेने दखल घेत योग्य सहकार्य केल्यामुळेच हा प्रश्न मार्गी लागला आहे, अशी भावना व्यक्त करत आमदार सुमित वानखेडे यांनी शासनाचे आभार मानले आहेत. या निर्णयामुळे कारंजा तालुक्यातील शेतकरी आणि शेतमजुरांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या शासन निर्णयानुसार, दुष्काळग्रस्त घोषित झालेल्या ३०५ तालुक्यांमध्ये जमीन महसूलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कर्जवसुलीला स्थगिती आणि कृषी वीजपंपांच्या चालू वीजबिलात नियमानुसार सूट देण्यात येणार आहे. तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोजगार हमी योजनेंतर्गत अधिकाधिक कामे सुरू करणे, आणि आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच, टंचाईग्रस्त गावांमध्ये कृषी वीजजोडण्या खंडित न करणे, शेतकरी व शेतमजुरांसाठी अन्नधान्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, जनावरांसाठी चाऱ्याची योग्य व्यवस्था करणे आणि जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर हाती घेणे यांसारख्या महत्त्वाच्या उपाययोजना देखील प्रभावीपणे राबवल्या जाणार आहेत. कारंजा तालुक्याचा यादीत समावेश झाल्यामुळे आता येथील स्थानिक नागरिकांना व शेतकऱ्यांना या सर्व शासकीय सवलतींचा थेट लाभ मिळणार आहे.

वाई बाजार येथे भारतीय बौद्ध महासभा शाखांची नवनिर्वाचित कार्यकारिणी उत्साहात जाहीर !



माहूर प्रतिनिधी - अविराज पठाडे

भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने माहूर तालुक्यातील वाई बाजार येथे महिला व युवक शाखांच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीची घोषणा नुकतीच करण्यात आली. माहूर तालुका अध्यक्ष ?ड. छंदक वाठोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीत समाज विकासासंदर्भात पुरुष व महिला पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असून, वाघोणकर यांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

युवक शाखा अधिक बळकट करण्यासाठी तरुण कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या वाटप करण्यात आल्या असून, वाई बाजार येथील युवक शाखेची पुनर्रचना करण्यात आली आहे. यामध्ये युवक शाखा अध्यक्ष म्हणून आनंद खडसे, उपाध्यक्ष म्हणून सुरेश खडसे, सरचिटणीस म्हणून अविनाश पठाडे, कोषाध्यक्ष म्हणून सागर खडसे, कार्यालयीन सचिव म्हणून प्रफुल खडसे, हिशोब तपासणीस सिद्धार्थ खडसे, सचिव (पर्यटन) म्हणून अजय खडसे, सचिव (महिला) म्हणून प्रज्ञा अनंत कांबळे, सचिव (संस्कार) म्हणून विशाल खडसे, संघटक म्हणून विवेक खडसे, रवी खडसे, सुमेध खडसे, दिपक खडसे, आदित्य खडसे, रोहन पारधे, मिलिंद गायकवाड, सौरभ खडसे आणि शौकांत मुजमुले यांच्या समाज आणि कुटुंबात बौद्ध संस्कृतीचे संस्कार रुजवण्यासाठी महिला आघाडीची घोषणा पुढील प्रमाणे करण्यात आली

अध्यक्ष शीला वाठोरे, उपाध्यक्ष रेखा खडसे, सरचिटणीस गीतमी धोरात, कोषाध्यक्ष छब्बूबाई पठाडे, कार्यालयीन सचिव वनिता पारधे, हिशेब तपासणीस वैशाली खडसे, सचिव (संस्कार) वंदना भगत, सचिव (पर्यटन) सुलोचना खडसे, सचिव (महिला) रंजना खडसे, सचिव (संस्कृत) सीमा खडसे, संघटक मंगला खडसे, वेबीबाई तायडे, प्रियंका कांबळे, रंजना पारधे, उषशी खडसे, शीलाबाई खडसे आणि सपना खडसे.

नवनियुक्ति पदाधिकाऱ्यांनी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार व प्रचार करण्याचे आणि समाजातील प्रत्येक घटकापर्यंत महासभेचे कार्य पोहोचवण्याचे काम करावे. उपस्थित मान्यवरांनी सर्व नवनियुक्ति पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि त्यांच्या भावी सामाजिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. वाई बाजार येथील या नव्या कार्यकारिणीमुळे माहूर तालुक्यात भारतीय बौद्ध महासभेचे कार्य अधिक जोमाने आणि शिस्तबद्ध पद्धतीने चालण्यास नक्कीच मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

देवळी येथे विधानसभा स्तरीय पाणी टंचाई आढावा बैठक



आरती कारंजेकर

देवळी (प्रतीनिधी) : जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत देवळी येथे विधानसभा स्तरीय पाणी टंचाई आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत देवळी, वर्धा व हिंगणघाट तालुक्यातील पाणी टंचाईची सद्यस्थिती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, अवैध उपसा कारवाई, चारा नियोजन तसेच आगामी काळातील संभाव्य परिस्थिती यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीत तालुक्यातील विविध गावांमधील पाणी स्रोतांची स्थिती, विहिरी व बोअरवेल पातळीमधील पाणीसाठा, टँकरची सध्याची संख्या व गरज, तसेच

पाणी टंचाईग्रस्त गावांचा आराखडा तयार

करणे याबाबत चर्चा करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांनी सद्यस्थितीचे माहिती सादर केली.

अवैध उपसा कारवाई

बैठकीत नद्या, कालवे, तलाव व इतर जलस्रोतांमधून होणाऱ्या

अवैध उपसा या गंभीर मुद्द्यावर सविस्तर

चर्चा झाली. जिल्हाधिकाऱ्यांनी अशा अवैध उपसा करणाऱ्यांवर कठोर व तातडीने कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. अवैध उपसा शोधून काढणे, त्वरित बंद करणे, वाहने, पंप व उपकरणे जप्त करणे, संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करणे आणि पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे संरक्षण करणे याबाबत संबंधित यंत्रणांना ठोस पावले उचलण्याचे आदेश देण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनीही ग्रामपंचायत व संबंधित यंत्रणांना अवैध उपसा विरोधात तत्काळ कारवाई करण्याचे व स्रोत संरक्षणासाठी समन्वय साधण्याचे निर्देश दिले. पाणी टंचाईच्या काळात अशा प्रकारच्या अवैध कृतींना कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

चारा नियोजन

पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता हा महत्त्वाचा मुद्दा चर्चेत आला. पशुसंवर्धन विभागाने चारा छावण्यांची आवश्यकता, हिरवा व कोरडा चारा उपलब्धता, चारा वितरणाची सद्यस्थिती आणि ग्रामस्तरावर करावयाच्या उपाययोजना याबाबत माहिती सादर केली. जिल्हाधिकाऱ्यांनीचाऱ्याची टंचाई होऊ नये यासाठी आगाऊ नियोजन करून आवश्यक ती व्यवस्था करण्याचे निर्देश दिले.

मुख्य 'कार्यकारी अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत, पशुधन विकास अधिकारी व संबंधित विभागांच्या समन्वयाने तात्काळ कृती आराखडा तयार करून अंमलबजावणी करण्याचे, तसेच चारा छावण्या व वितरण व्यवस्थेबाबत ग्रामस्तरावर प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश दिले.

इतर महत्त्वाचे निर्देश

जिल्हाधिकाऱ्यांनी पाणी टंचाईग्रस्त गावांची अद्ययावत यादी तयार करून तातडीने पाणी स्रोत मजबूत करणे, पाणी बचतीसाठी जनजागृती करणे आणि नागरिकांना पिण्याचे पाणी नियमित मिळेल याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिले. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पाणी स्रोतांचे बळकटीकरण आणि ग्रामपंचायत स्तरावर पाणी व्यवस्थापनासाठी तात्काळ कृती आराखडा तयार करून अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले. दीर्घकालीन उपाययोजना म्हणून पावसाळी पाणी संधारण, तलाव गाळ काढणे व पाणी स्रोत पुनर्भरण बावरही चर्चा झाली.या बैठकीस उपविभागीय अधिकारी प्रफुल चौधरी, तहसीलदार समर्थ क्षिरसागर देवळीचे गटविकास अधिकारी प्रफुल्ल लोखंडे वर्धा, हिंगणघाट जलसंपदा व पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी, गटविकास अधिकारी, ग्रामसेवक, नगरपालिका अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानासाठी तालुकास्तरीय कार्यशाळा उत्साहात संपन्न



आर्वी : वर्धनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृह, पंचायत समिती, आर्वी येथे 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मा. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उषा कवरासे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हाकक्ष मा. डॉ मोरेश्वर येवतकर सर (मा. बा. स. अधिकारी) व डॉ. नखाते सर, मा. श्री.हेगोले सर (गट विकास अधिकारी, आर्वी) यांच्या उपस्थितीत कार्यशाळा पोषवात आली.

गावगणतर आरोग्यदादायी वातावरण निर्माण करून नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, आरोग्यविषयक जनजागृती वाढविणे तसेच विविध आरोग्य उपक्रमांमध्ये ग्रामपंचायत व ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग वाढविणे हा अभियानाचा प्रमुख उद्देश असल्याचे कार्यशाळेत सांगण्यात आले.

यावेळी अभियानाची उद्दिष्टे, ध्येय, प्रमुख वैशिष्ट्ये व प्रभावी अंमलबजावणीची कार्यपद्धती याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अभियानामध्ये समाविष्ट करण्यात येणाऱ्या प्रमुख आरोग्य बाबी, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध, आरोग्यविषयक जनजागृती, स्वच्छता, पोषण, माता-बाल आरोग्य, लसीकरण आदी विषयांवर माहिती देण्यात आली.अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींची निवड करून त्यांना पुरस्कार देण्यात येणार असून, त्यासाठी गावपातळीवर विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे व आरोग्य निर्देशांक सुधारण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

याशिवाय विविध स्तरांवर आरोग्य मेळावे, जनजागृती कार्यक्रम, ग्रामसभा व विविध उपक्रमांचे आयोजन करता पढतीने करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आरोग्य विभागासोबत ग्रामपंचायत, महिला बचत गट, शाळा, अंगणवाडी, आशा स्वयंसेविका व इतर संबंधित विभागांचा समन्वय महत्त्वाचा असल्याचे नमूद करण्यात आले. कार्यशाळेमुळे तालुक्यातील गावांमध्ये 'निरोगी गाव – समृद्ध गाव' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यासाठी आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिशा मिळाली. कार्यशाळेस आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, विस्तार अधिकारी,आरोग्य निरीक्षक, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहचिका,तालुका समूह संपर्क क, बाल विकास प्रकल्प अधिकारी, गटप्रवर्तक, आशाताई, अंगणवाडी पर्यवेक्षिका, व इतर अधिकारी-कर्मचारी तसेच ग्रामपंचायत सचिव, अधिकारी / कर्मचारी, संबंधित प्रतिनिधी उपस्थित होते.

केंद्र शाळा कुंडली येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा...



बीड वडवणी प्रतिनिधि: -

कुंडली येथे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त केंद्र शाळा कुडली येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. कलाम यांनी आपल्या ज्ञान, विज्ञाननिष्ठ विचार आणि शिक्षणाप्रती असलेल्या समर्पणातून देशातील लाखो विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांनी भरपूर वाचन करावे, ज्ञान मिळवावे आणि मोठी स्वप्ने पाहावीत, असा त्यांचा संदेश होता.या निमित्ताने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी वाचन उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. सर्व विद्यार्थ्यांचे वाचन घेण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि वाचन संस्कृती रुजावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मोहन राठोड, शिक्षक अविनाश जाधवर तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

खडका येथील शेतकऱ्याची आत्महत्या

आष्टी (वर्धा) : सततची नापिकी, बँकेचे कर्ज आणि आजारपणाच्या उपचारासाठी पैशांची अडचण यामुळे चिंतेत असलेल्या खडका येथील एका ५० वर्षीय शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. प्रफुल रामदास नांदणे असे मृत शेतकऱ्याचे नाव असून, या प्रकरणी तळेगाव श्यामजी पंत पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रफुल नांदणे हे १४ ऑक्टोबर रोजी सकाळी शेतात गेले होते. मात्र, ते घरी परत न आल्याने त्यांचा शोध घेण्यात आला. दरम्यान, १५ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास बोधनापूर शिवारातील भिष्णूर परिसरात एका पडीत जागेतील लिंबाच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत ते आढळून आले.

मृत प्रफुल नांदणे हे बोधनापूर येथे एक एकर शेतीची लागवड करीत होते. मागील दोन ते तीन वर्षांपासून सततच्या नापिकीमुळे आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत होता. त्यातच बँकेचे कर्ज आणि डोक्याच्या आजाराबरील उपचारांसाठी पैशांची अडचण असल्याने ते चिंतेत असल्याची माहिती पोलिसांत दिलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आली आहे.या प्रकरणी त्यांचे मेव्हणे मारुती हरिदास कुरवाडे (वय ५१, रा. तिवसा, जि. अमरावती) यांनी १५ ऑक्टोबर रोजी तळेगाव श्यामजी पंत पोलीस ठाण्यात तोंडी माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, पुढील तपास ठाणेदार मंगेश भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक लीलाधर उकंडे करीत आहेत.

ॲड.आंबेडकर यांना पाठबळ देण्यासाठी वंचितच्या उमेदवारांना निवडून द्या : प्रा.सोमनाथ साळुंखे



सातारा (अनिल वीर यांजकडून) : निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाने चागल्या पद्धतीने नावनोंदणी केली आहे.त्यामुळे विरोधकांवर मात करून आपला विजय सुकर होणार आहे. ?ड.प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या आवाहनास ओबीसीही प्रतिसाद देत आहेत.असे प्रतिपादन प्रा.सोमनाथ साळुंखे यांनी केले.

वंचित बहुजन आघाडीचे पुणे विभागीय विधान परिषदेचे पदवीधर उमेदवार प्रा.सोमनाथ साळुंखे व शिक्षक उमेदवार डॉ. शेख यांच्या प्रचारार्थ सभा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळाजवळील सांस्कृतिक सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाली.तेव्हा उमेदवार तथा महाराष्ट्र प्रदेश महासचिव प्रा.सोमनाथ साळुंखे मार्गदर्शन करीत होते.ते पुढे म्हणाले, 'मतदारांनी बुथपर्यंत पोहचण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावा.कमी दिवस राहिल्याने मतदारापर्यंत पोहचणे गरजेचे आहे. बीजेपीला सक्षम पर्याय म्हणून वंचितच आहे.त्यामुळे विजय आपलाच मिळणार आहे.पदवीधरामध्ये ४७ उमेदवार उभे असले तरी खरी लढत तिरंगीच होणार आहे.'

उमेदवार डॉ.शेख म्हणाले,'वंचितच्या उमेदवारांना पसंती क्रमांक एकचे मत देऊन आम्हाला विजय करावे. आपण ३७ वर्षे शिक्षण क्षेत्रात काढली असल्याने शिक्षकांचे प्रश्न माहीत आहेत. उपक्रमशील अधिकारी म्हणून २२ वर्षे प्रशासनात व डाएटचे प्राचार्य म्हणूनही काम केले होते. स्वेच्छा निवृत्ती घेऊन बहुजन चळवळीत काम करीत आहे.'

जिल्हाध्यक्ष ॲड.दयानंद माने (पश्चिम) यांनी प्रास्ताविकपर निवडणुकाबाबत आढावा घेतला. जिल्हा सचिव योगेश कांबळे यांनी स्वागत केले तर तालुकाध्यक्ष समाधान कांबळे यांनी आभार मानले.सदरच्या कार्यक्रमास शहराध्यक्ष मिलिंद कांबळे, जिल्हा युवाध्यक्ष अमोल गंगावणे, जिल्हा महासचिव सायली भोसले, रंजकांत खंडाईत, सुधाकर काकडे,श्रीरंग वाघमारे, जाधव,निवृत्ती रोकडे, दीपक चव्हाण, बामन गंगावणे, सर्व विंजचे आजी-माजी पदाधिकारी, महिला कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'तायवाडे कॉलेज येथे 'आविष्कार आयडियाथॉन २०२६' स्पर्धेचे आयोजन'

कोरडी/ दिलीप येवले: -

तायवाडे कॉलेज, महादुला-कोराडी येथे दिनांक १३ ऑक्टोबर २०२६ रोजी 'आविष्कार आयडियाथॉन – इनोवेशन कॉम्पिटिशन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील पदवी (ळउ), पदव्युत्तर (इउ) तसेच पिएच. डी. स्तरावरील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना, संशोधन संकल्पना आणि सर्जनशील विचार पोस्टर व मॉडेलच्या माध्यमातून सादर केले. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, नवकल्पना आणि आंतरविद्याशाखीय विचारांना प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. या स्पर्धेतील प्रकल्पांचे परीक्षण तायवाडे कॉलेज चे आयक्यूएसी समन्वयक डॉ. गिरीश काटकर आणि तायवाडे इंस्टीट्यूट ऑफ डिप्लोमा इन फार्मसी चे प्राध्यापक श्री. विक्रांत चिलाटे यांनी केले. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे परीक्षण करून त्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनांचे कौतुक केले. त्यांनी स्पर्धेतील विजेत्यांचे अभिनंदन केले तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना भविष्यातही संशोधन, नवकल्पना आणि सर्जनशील कार्यात सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित केले.



या स्पर्धेला महाविद्यालयातील इतर अनेक विद्यार्थ्यांनीही विविध पोस्टर्स आणि मॉडेल्सचे निरीक्षण करून नाविन्यपूर्ण कल्पना आणि प्रकल्पांविषयी माहिती घेतली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन आणि नवोपक्रमांविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. या कार्यक्रमाला इंग्रजी विभागाच्या विभागप्रमुख डॉ. वर्षा वैद्य आणि वनस्पतिशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. सुवर्णा पाटील उपस्थित होत्या. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. प्रेरणा थोरात, डॉ. लीना कोंडे आणि डॉ. कमलेश डाबरे यांनी अथक परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना आपल्या कल्पना सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा उपक्रम महाविद्यालयातील संशोधन आणि नवोपक्रम संस्कृतीला चालना देणारा ठरला.

'भीमगर्जना' आणि 'बुद्धं शरणं गच्छामि'च्या जयघोषाने दुमदुमला ड्रॅगन पॅलेस टेम्पल परिसर

१४ ऑक्टोबर धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीसह ड्रॅगन पॅलेस येथे जनसागराचे महातूफान

नीलध्वजांचे शहर: ऐतिहासिक ड्रॅगन पॅलेस टेम्पल श्रद्धा आणि प्रेरणेचा महाकुंभ

नागपूर/ दिलीप येवले:

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूरच्या पावन भूमीवर लाखो अनुयायांसोबत बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन सामाजिक क्रांतीचे नवे पर्व सुरू केले होते. याच ऐतिहासिक दिनाचे औचित्य साधत नागपूर येथील दीक्षाभूमी वर ड्रॅगन पॅलेस टेम्पल परिसर लाखो भीमानुयायांच्या अथांग जनसागराने ओसंडून वाहत आहे.

आकाशाला गवसणी घालणारे

निळे ध्वज: रेल्वे स्टेशन, बस स्थानक आणि इतर ठिकाणाहून येणाऱ्या प्रत्येक रस्त्यावर केवळ आणि केवळ निळे ध्वज, पंचशील पताका आणि बाबासाहेबांच्या जयघोषाचे चित्र पाहायला मिळत आहे.

?पवित्र दीक्षाभूमी स्तूपाचे दर्शन घेऊन ड्रॅगन पॅलेस टेम्पल परिसरात देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या अनुयायांनी कित्येक किलोमीटर लांब रांगा लावल्या आहेत. लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांच्या चेहऱ्यावर धकळ्याऐवजी केवळ कृतज्ञतेची ऊर्जा पाहायला मिळत आहे.

कामठीतील ड्रॅगन पॅलेस टेम्पल: शांती, करुणा आणि आकर्षणाचे केंद्र

दीक्षाभूमीसोबतच कामठी येथील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ड्रॅगन पॅलेस टेम्पल हे आज लाखो भाविकांच्या उपस्थितीने प्रकाशमय झाले आहे. जपानी वास्तुकलेचा अद्वितीय नमुना असलेले ही वास्तू सध्या आध्यात्मिक ऊर्जेचा केंद्रबिंदू ठरत आहे.सुवर्ण बुद्ध प्रतिमेचे दर्शन: ड्रॅगन पॅलेसच्या भव्य हॉलिमध्ये प्रतिष्ठापित भगवान बुद्धांच्या अखंड चंदनाच्या लाकडापासून कोरलेल्या सुवर्ण प्रतिमेसमोर अनुयायांनी नतमस्तक होऊन धम्मवंदना घेतली.

विपश्यना आणि शांतीचा अनुभव:

परिसरात उभारण्यात आलेल्या विपश्यना केंद्रात शेकडो उपासक-उपासिकांनी मौन पाळून ध्यानाचा सराव केला. मनमोहक रोषणाई आणि उद्यान: संपूर्ण परिसर विद्युत रोषणाईं आणि फुलांच्या सजावटीने उजळून निघाला आहे. दीक्षाभूमीवर वंदन केल्यानंतर प्रत्येक अनुयायी ड्रॅगन पॅलेसच्या दर्शनासाठी आवर्जून गर्दी करत आहे.

पुस्तकांचे स्टॉल्स आणि वैचारिक प्रबोधनाची जत्रा

ड्रॅगन पॅलेस चे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे इथे केवळ धार्मिक विधी होत नाहीत, तर वैचारिक जागर घडवला जातो. ग्रंथोत्सव: दीक्षाभूमी परिसरात शेकडो पुस्तकांचे स्टॉल्स थाटण्यात आले आहेत.बाबासाहेबांचे मूळ लेखन, भाषणे, संविधान, बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथांची विक्रमी खरेदी सुरू आहे.

'शिकलेले हात, पुस्तकांची साथ' हा संदेश इथे प्रत्यक्षात अनुभवता येतो.

प्रबोधनात्मक शाहिरी आणि भीमगीते: रस्त्या-रस्त्यांवर कडाडणारे डफ आणि शाहिरांच्या बुलंद आवाजातील भीमगीतांनी तरुणांमध्ये अभूतपूर्व ऊर्जा भरली आहे.

सेवाभाव आणि कडेकोट प्रशासन व्यवस्था

वातावरण पूर्णतः बुद्धमय आणि भीमय झाले असून, समता, बंधुता आणि स्वातंत्र्याची मूल्ये जपणारा हा जनसागर मानवतेचा सर्वात मोठा उत्सव साजरा करत आहे.

आर्वी येथे पदवीधर मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद ; भाजप उमेदवार सुधाकर कोहळे यांना विविध संघटनांचा जाहीर पाठिंबा

पदवीधर मतदार भाजप उमेदवाराला भरघोस मतांनी विजयी करतील : आमदार सुमित वानखेडे



आर्वी/ प्रतिनिधी उमंग शुक्ला

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी व मित्रपक्षाचे अधिकृत उमेदवार श्री. सुधाकर विठ्ठलराव कोहळे यांच्या प्रचारार्थ आर्वी येथे पदवीधर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. बुधवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता शिलाराम मंगल कार्यालयात संपन्न झालेल्या या मेळाव्यात भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच आर्वी विधानसभा क्षेत्रातील पदवीधर मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्यात विविध सामाजिक, व्यावसायिक आणि कर्मचारी संघटनांनी उमेदवार सुधाकर कोहळे यांना समर्थन पत्र देऊन जाहीर पाठिंबा दर्शविला. त्यामुळे पदवीधर निवडणुकीच्या प्रचाराला आर्वीमध्ये नवी ऊर्जा मिळाल्याचे चित्र दिसून आले.

या मेळाव्याच्या माध्यमातून पदवीधर मतदारांशी संवाद साधत निवडणुकीच्या प्रचाराला गती देण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रमुख उपस्थितीमध्ये राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार रामदास तडस, माजी आमदार दादाराव केचे, भाजपचे जिल्हाध्यक्ष संजयजी गाते, आर्वी विधानसभा प्रमुख विजयजी बाजपेयी, सारिकाताई गाखरे, नगराध्यक्ष स्वातीताई गुल्हाने, अनिल भाऊ जोशी यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे आयोजन सुधाकरावजी कोहळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते.

विविध संघटनांकडून सुधाकर कोहळे यांना जाहीर पाठिंबा

पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या मेळाव्यात विविध क्षेत्रातील संघटनांनी आपली भूमिका स्पष्ट करत भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे यांना पाठिंबा दिला. यामध्ये डॉक्टर असोसिएशन, ॲडव्होकेट असोसिएशन, संताजी बहुउद्देशीय संस्था तेली समाज, मेडिकल असोसिएशन, ऑईलमिल असोसिएशन, जिनिंग असोसिएशन, कृषी केंद्र असोसिएशन, माजी सैनिक संघटना, प्राथमिक शिक्षक संघटना, लायन्स क्लब आर्वी, बोहरा समाज तसेच गुरुकुल पब्लिक स्कूल कारंजा यांच्यासह विविध संस्थांचा सहभाग होता. या संघटनांच्या प्रतिनिधींनी उमेदवार कोहळे यांना समर्थनपत्र देऊन जाहीर पाठिंबा दर्शविला. विविध सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रातील प्रतिनिधी एकत्र आल्याने या मेळाव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

पदवीधर मतदारांच्या समस्या, त्यांच्या अपेक्षा आणि शिक्षण व रोजगाराशी संबंधित प्रश्नांना प्राधान्य मिळावे, या दृष्टीने या निवडणुकीत योग्य प्रतिनिधी निवडण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

पदवीधर मतदार भाजप उमेदवाराला भरघोस मतांनी विजयी करतील : आमदार सुमित वानखेडे

आमदार सुमितदादा वानखेडे यांनी आपल्या भाषणातून पदवीधर मतदारांना भाजप उमेदवार सुधाकर कोहळे यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, पदवीधर मतदार हा सुशिक्षित आणि जागरूक घटक असून, आपल्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि आपल्या हक्कांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी योग्य उमेदवाराची निवड करणे आवश्यक आहे. त्यामुळे पदवीधर मतदार निश्चितच भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे यांना मतदान करून भरघोस मतांनी विजयी करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कामठीत कर्मवीर दादासाहेब कुंभारे स्मृतीदिन साजरा



नीगपूर दिलीप वेवले:

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पावन पर्वावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निष्ठावंत अनुयायी आणि दलित शोषित व बिडी कामगारांचे नेते कर्मवीर दादासाहेब कुंभारे यांच्या स्मृतीदिनानिमित्त आज १४ ऑक्टोबर रोजी कामठी येथील ड्रॅगन पॅलेस कॅम्पसमध्ये विविध सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या निमित्ताने आयोजित आरोग्य शिबिरात १२१५ तर नेत्र तपासणी शिबिरात तब्बल १७२० अशा एकूण २,९३५ गरजू रुग्णांची तपासणी करण्यात येऊन त्यांना औषधोपचार व योग्य सल्ला देण्यात आला.

?कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी राज्यमंत्री तथा ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या प्रमुख ?ड. सुलेखाताई कुंभारे यांनी भूषविले.

?दिवसभरातील उपक्रमांनी परिसर गजबजला

?विशेष बुद्धवंदना व अभिवादन:

सकाळी १०.०० वाजता ड्रॅगन पॅलेस टेम्पल येथे विशेष बुद्धवंदना घेण्यात आली. त्यानंतर १०.३० वाजता ड्रॅगन पॅलेस कॅम्पसमधील कर्मवीर दादासाहेब कुंभारे यांच्या पूर्णाकृती शिल्पाला पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

आरोग्य व नेत्र तपासणी शिबिर:

सकाळी ११.०० वाजता एम.टी.बी.सी. हॉलमध्ये भव्य शिबिराचे उद्घाटन माजी खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. श्रीरंग वराडपांडे आणि डॉ. विलास सपकाळ उपस्थित होते. या शिबिरात स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटर, नागपूर; डॉ. महात्मे आय हॉस्पिटल, नागपूर; आशा हॉस्पिटल, कामठी आणि लायन्स क्लब, कामठी यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूने सेवा दिली.

??या संपूर्ण भव्य उपक्रमाचे यशस्वी आयोजन ओगावा सोसायटी, विश्वविख्यात ड्रॅगन पॅलेस टेम्पल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक व संशोधन केंद्र, ड्रॅगन पॅलेस विपश्यना मेडिटेशन सेंटर, हरदास शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था, दादासाहेब कुंभारे बहुउद्देशीय प्रशिक्षण संस्था, ड्रॅगन इंटरनेशनल स्कूल आणि ओगावा इंटरप्रायजेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

शेगावच्या गजानन महाराज संस्थानला ३.८१ हेक्टर जमिन

- बुलढाण्यातील गिरडा येथे ३.८१ हेक्टर जमिनीवर बांधकामास मंजुरी
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचेचा प्रस्ताव मंजूर
- राज्य मंत्रिमंडळाचा मंजुरी

नागपूर / दिलीप वेवले

बुलढाणा जिल्ह्यातील गिरडा येथे श्री संत गजानन महाराज संस्थान, शेगाव यांना यात्रास्थळाच्या विकासासाठी ३.८१ हेक्टर शासकीय जमिनींवर कायमस्वरूपी बांधकाम करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने हा निर्णय झाल्याने गिरडा येथे स्मृतीकेंद्र, रुग्णालय, निवास संकुलासह विविध सुविधा उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

गिरडा येथे वृक्षलागवडीसाठी संस्थानला १९.०६ हेक्टर शासकीय जमीन देण्यात आली होती. या जागेवर स्मृतीकेंद्र, इको टुरिझम सेंटर, शांती कुटीर, निवास संकुल, नॅचरोपथी केंद्र, आयुर्वेदिक संशोधन केंद्र, रुग्णालय आणि ग्रामीण कुटीर उद्योग सुरू करण्यासाठी सुविधा उभारता येतील. त्यामुळे गिरडा येथे येणाऱ्या भाविकांना निवास, आरोग्यसेवा आणि निसर्गपर्यटनाच्या सुविधा मिळण्यास मदत होईल.

यापूर्वी या जमिनीवर वृक्षलागवडीसाठी मंजुरी देण्यात आली होती. मात्र, यात्रास्थळाच्या विकासासाठी कायमस्वरूपी बांधकामाची गरज लक्षात घेऊन शासनाने विशेष मंजुरी दिली आहे. यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदी आणि १६ ऑगस्ट १९९० च्या शासन निर्णयातील नियमांबाबत विशेष सूट देण्यात आली आहे. ही परवानगी शासनाने घालून दिलेल्या अटींनुसार असेल.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, 'शेगाव संस्थानाचे सर्व पदाधिकारी आणि संस्थानाचे अध्यक्ष तसेच त्या भागातील आमदार संजय कुटे यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी यासाठी खूप पाठपुरावा केला होता. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत शेगाव संस्थानाच्या विकासासाठी ३.८१ हेक्टर जागा देण्यात आली आहे. श्री संत गजानन महाराज संस्थान, शेगाव हे लाखो भाविकांच्या श्रद्धेचे स्थान आहे. गिरडा येथे स्मृतीकेंद्र, रुग्णालय, आयुर्वेदिक संशोधन केंद्र, नॅचरोपथी केंद्र आणि निवास संकुल यांसारख्या सुविधा उभ्या राहिल्याने भाविकांना मोठा फायदा होईल.

कर्जमाफीची केवायसी करून दोन महिने पण खात्यात एकही रुपया जमा नाही

काही शेतकऱ्यांवर मोठा अन्याय होत असल्याचा आरोप

साहुर/ शरद वरकड



आष्टी तालुक्यातील साहुर येथील शेतकरी कर्जमाफीमुळे उत्स झाले असून ही कर्जमाफी खरी आहे की खोटी आहे या संभ्रमात आहेत पहिल्या यादीमध्ये शेतकऱ्यांची नावे आलीत व त्यांनी तात्रवतांक केवायसी सुद्धा केली त्या यादीला आज दोन महिने ११ दिवसाचा कालावधी लोटून गेला परंतु खात्यामध्ये मात्र एकही रुपया जमा झाला नाही ही एक कोणाची आहे त्याकरता साहुर येथील शेतकरी बहीं अर्ज पेऊन विद्यमान आमदार सुमित दादा वानखडे यांच्या कार्यालयात गेले व तेथे अर्ज दिले परंतु बँकेच्या खात्यात मात्र एकही रुपया जमा न झाल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत सापडलेला आहे जर पहिल्याच यादी मधील शेतकऱ्यांचा खात्यात पैसे जमा झाले नाही तर शेवटच्या यादीमधील शेतकऱ्यांचे काय होणार असा प्रश्न आता शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेला आहे दुष्काळीसे सावट डोक्यावर असून नवीन कर्ज उचलण्याच्या धावपळीत शेतकरी असतानाच पूर्वीचे कर्ज माफ झाले नाही तर नवीन कर्ज मिळणार कसे असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेला आहे सर्व डाटा असतानाही सुद्धा अशा प्रकारच्या अडचणी येणे म्हणजे संभ्रम निर्माण करणे होय अशी प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करीत आहे म्हणून ज्या ज्या शेतकऱ्यांचा केवायसी पूर्ण झाल्या त्या त्या शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा करणे ही सरकारची जबाबदारी आहे आणि ते पैसे लवकरात लवकर जमा करावे अशी मागणी येथील शेतकरी करीत आहे.

भटक्या विमुक्त समाजाचा निवासाचा प्रश्न मार्गी !

केवळ १ रुपयात निवासासाठी जागा देण्याचा प्रस्ताव;ङ स्वतंत्र बजेट आणि मेंढपाळ चराई धोरणावर चर्चा

- कामचुकार अधिकाऱ्यांवर महसूलमंत्र्यांची नाराजी

नागपूर, दिलीप वेवले :

भटक्या विमुक्त समाजाच्या कायमस्वरुपी पुनर्वसासाठी सरकार नाममात्र १ रुपयात जागा उपलब्ध करुन देणार आहे. त्यासाठी प्रस्ताव तातडीने तयार करुन मंत्रिमंडळासमोर आणण्याचे निर्देश ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

दरम्यान, बैठकीत दिलेल्या सूचना गांभीर्याने न घेणाऱ्या आणि कामचुकारपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती व भटक्या जमाती (व्हीजेएनटी) आणि विशेष मागास प्रवर्गाच्या (एसबीसी) सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी गठित करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची सातवी बैठक येथील सह्याद्री अतिथीगृहावर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीला अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, वनमंत्री गणेश नाईक, पर्यावरण व वातावरणीयबदल मंत्री पंकजा मुंडे, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

बावनकुळे म्हणाले, पालावर आणि तात्पुरत्या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या भटक्या-विमुक्त समाजाच्या नागरिकांना जात प्रमाणपत्रे व इतर दाखले देण्यात यावेत. तसेच त्यांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनासाठी आणि नवीन वसाहती निर्माण करण्यासाठी जागांचा प्रस्ताव तातडीने तयार करुन द्यावा. 'अधिकारी बैठकीतील सूचना गांभीर्याने घेत नाहीत, इतर मागास बहुजन कल्याण विभाग मागे पडत आहे आणि आवश्यक ते प्रस्ताव वेळेत सादर केले जात नाहीत. १ रुपयात जागा उपलब्ध करून देऊनही प्रस्तावच दिले गेले नाहीत,' अशा शब्दांत त्यांनी ताशेरे ओढले. ज्या ठिकाणी जागा नाहीत त्याठिकाणच्या जागांचे प्रस्ताव २९ ऑक्टोबरपर्यंत कोणत्याही परिस्थितीत सादर करण्याचे कडक आदेश त्यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

राज्यातील मेंढपाळ बांधवांच्या चराई क्षेत्राच्या प्रश्नावर बैठकीत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. महसूल व वन विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, राज्यातील २१ वनविभागांमध्ये जून ते सप्टेंबर या काळात मेंढी चराईसाठी कायदेशीर परवानगी देण्यात आली आहे; तर वनक्षेत्र उपलब्ध नसलेल्या उर्वरित २७ वनविभागांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार चराईसाठी जागा उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर वनमंत्री गणेश नाईक यांनी दुष्काळी परिस्थितीत चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण होत असल्याने सर्व अधिकाऱ्यांनी ड्रोन सर्व्हे करून चाऱ्याची उपलब्धता तपासावी आणि डीपीडीसीच्या (३ड३०) निधीतून चारा उपलब्ध करून द्यावा, अशी महत्त्वपूर्ण सूचना केली. तसेच नोकरभरतीतील ९ टक्के अनुशेष आणि आर्थिक असमानता दूर करण्यासाठी उपसमितीने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणीही त्यांनी मांडली.

'महाज्योती' (महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था) आणि इतर मागासवर्गीय महामंडळांच्या निधीवाटपावर जोरदार चर्चा झाली. सध्या महाज्योतीमार्फत ५९३ओबीसी, १०३विमुक्त जाती, २५३भटक्या जमाती (ब, क, ड) आणि ६३ विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लाभ दिला जात आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी 'सारथी' संस्थेला १,४८४ कोटी रुपये मिळत असताना 'महाज्योती'ला केवळ २८८ कोटी रुपये मिळत असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. सर्व संस्थांना निकषानुसार समान निधी मिळायला हवा, 'एकाला तुपाशी आणि एकाला उपाशी' अशी भूमिका चालणार नाही, असे सांगत त्यांनी आधी मंजूर केलेला सर्व निधी तातडीने वितरित करण्याची मागणी केली. यावर महसूल मंत्री बावनकुळे यांनी ६०० कोटी रुपयांच्या बजेटमधील सर्व पैसे वितरित झाले असल्याचे सांगत, कोणत्याही परिस्थितीत अर्धसंकल्पीत निधी कमी केला जाणार नाही आणि याप्रकरणी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून अतिरिक्त निधीचे नियोजन केले जाईल, असे आश्वस्त केले. तसेच व्हिजेएनटी (ञ्क्ऊ) प्रवर्गासाठी स्वतंत्र बजेट तयार करण्याचा प्रस्तावही बैठकीत मांडण्यात आला.

इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी ओबीसी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाबाबत स्पष्ट भूमिका मांडत, ओबीसी वसतिगृहे क्लब(एकत्र) करू नयेत. कार्यालयीन जागा आणि विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था स्वतंत्र असावी, असे निर्देश दिले. तसेच विभाग मागे राहिल्यास त्यास संबंधित विभागच जबाबदार राहील, असाइशारा ही त्यांनी दिला. सध्या महामंडळ आणि उपकंपन्यांसाठी नवी मुंबईतील सिडको बेलापूर रेल्वे स्थानक संकुलात ११,४५५ चौ. फूट जागा खरेदीची कारवाई अंतिम टप्प्यात असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेऊ नका; घेतले असल्यास परत करा!

विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल केल्यास महाविद्यालयांवर कठोर कारवाई करणार ; उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

दुष्काळग्रस्त तालुक्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क माफ उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा निर्णय

मुंबई/ दिलीप वेवले



राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक दिलासा देण्यासाठी कोणत्याही विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क न घेता त्यांचे परीक्षा अर्ज भरून घेण्यात यावेत. ज्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल करण्यात आले आहे, ते शुल्क त्यांना परत करण्यात यावे. विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी या निर्देशांचे पालन करावे. विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल केल्याचे आढळल्यास संबंधित महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

सह्याद्री अतिथिगृह,मुंबई येथे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत ऑनलाइन बैठक घेण्यात आली. या बैठकीत दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काचा आढावा घेण्यासह विद्यापीठांच्या परीक्षा प्रक्रिया, पेपरफुटी रोखण्यासाठी उपाययोजना, निकालांमधील सुसूत्रता, शैक्षणिक वेळापत्रक, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आणि विद्यार्थी निवडणुकांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी प्रधान सचिव रणजित सिंह देओल, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ संचालक तथा तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ प्रमोद नाईक, उपसचिव अमोल मुत्याल , उपसचिव प्रताप लुबाळ, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सर्व सार्वजनिक विद्यापीठांचे कुलगुरू (ऑनलाईन) व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये. यामध्ये अभियांत्रिकी महाविद्यालये, कला महाविद्यालये तसेच विभागाच्या अखत्यारीतील अन्य महाविद्यालयांचाही समावेश आहे. विद्यार्थ्यांवर आर्थिक भार पडू नये म्हणून हा निर्णय घेतला आहे.विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेतले असल्यास ते तातडीने परत करावे अशी सूचना मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सर्व कुलगुरू आणि संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर उपाययोजना

राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, पेपरफुटीसारखे गैरप्रकार रोखणे आणि निकाल प्रक्रियेत सुसूत्रता निर्माण करणे आवश्यक असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले. केंद्र सरकारने पेपरफुटी व परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी केलेल्या कायद्यातील तरतुदी महाराष्ट्रात लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

इंडियन मिलिटरी स्कूल पुलगावच्या खेळाडूंची क्रीडा स्पर्धांत चमक; मैदानी स्पर्धेत विभागीय स्तरावर निवड, कराटेत १६ विद्यार्थ्यांची पदकांची कमाई!



विरळ आकाजी : इंडियन मिलिटरी स्कूल, पुलगावच्या विद्यार्थ्यांनी मैदानी व कराटे स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करून शाळेचा नावलौकिक वाढविला. अंडर-१४, अंडर-१६ आणि अंडर-१९ गटांतील विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याच्या जोरावर यश संपादन केले. दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी पोलीस मुख्यालय, वर्धा येथे झालेल्या जिल्हास्तरीय अंडर-१९ शालेय मैदानी स्पर्धेत पार्थ क्षीरसागर याने २०० मीटर धावणे व ११० मीटर हर्डल्समध्ये प्रथम क्रमांक पटकावून विभागीय स्तरावर स्थान निश्चित केले. तसेच विश्वजीत धुर्वे, कोमल केसकर, सोहम राऊत व प्रथम अवथळे यांनी विविध प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी केली. ४४१०० मीटर रिलेमध्ये अमन मडावी, पार्थ क्षीरसागर, सुमेद वानखेडे व वंश सडमाके, तर ४४०० मीटर रिलेमध्ये यशवंत नासरे, देवांशू पीलारे, ध्रुव चकोले व चैतन्य वडगाये यांनी विभागीय स्तरासाठी पात्रता मिळवली.

दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी बुट्टीबोरी येथे आयोजित राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत शाळेच्या १६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके मिळवली. यामध्ये तेजस तोडासे, करण चंवुलवार, मोहन बोडे, वेदांत कोरे, अर्णव धुर्वे, देवांशू कुंभारे, वीर पाटील, प्रथमेश सहारे, जयेश मसराम, गोरक्षनाथ भराडे, श्रेयश केवटे, जिग्नेश कांबळे, रुचित मेश्राम, कुणाल परतेकी, सोहन क्षीरसागर व ओम वाघणे यांचा समावेश आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. मनोज भाऊ भेंडे, सचिव श्री. कृष्णा कडू, कमांडंट कर्नल के. एच. पाटील व प्राचार्य श्री. नितीन कोठे यांनी सर्व खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले. नायब सुभेदार सुनील मोहोड, हवालदार महेश अलसपुरकर, क्रीडा शिक्षक श्री. प्रमोद गुडधे, श्री. रिलेश उरकुडे व हिमांशू सर यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या जिद्द, शिस्त व मेहनतीमुळे इंडियन मिलिटरी स्कूल पुलगावने वर्धा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला!

डॉ. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा



डॉ. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला--

तळेगाव शा. प. येथील स्व. वत्सलाबाई गोहाड कनिष्ठ महाविद्यालयात डॉ. एपिजी अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य चंद्रकांत ताथोडे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा हरिभाऊ बोहरूपी प्रा. संजीव पोटे प्रा रमेश पवार प्रा देवेंद्र कुमावत प्रा. सुरज डोईजड प्रा लोकेश देवगडे व दिनेश मन वर उपस्थिती होते. प्रथम प्रतिमेचे पुजन व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्र वर विद्यार्थी यांनी प्रकाश टाकला. प्राचार्य चंद्रकांत ताथोडे यांनी भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम हे थोर शास्त्रज्ञ देशाचे राष्ट्रपती व एक मिशईल मॅन म्हणून त्यांची ओळख होती. त्यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी कारण्यात येते. कार्यक्रमा चे सूत्रसंचालन कु. मलिका परादे तर आभार प्रदर्शन कु. सोनिया कौरती हिने केले.

उद्योगांच्या गुंतवणूक परिसंस्था निर्मितीत महाराष्ट्र सर्वात आघाडीवर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्र-यूके भागीदारी शुभारंभ कार्यक्रमात महाराष्ट्रात गुंतवणुक करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आवाहन

मुंबई : कौशल्य, भांडवल आणि तंत्रज्ञानाची सांगड घालणाऱ्या ठोस गुंतवणुकीसाठी महाराष्ट्रात उत्कृष्ट परिसंस्था कार्यरत आहे. सर्वच क्षेत्रातील उद्योगांच्या गुंतवणुकीसाठी असलेल्या परिसंस्थेच्या निर्मितीत महाराष्ट्र हा सर्वात आघाडीवर आहे, या शब्दात महाराष्ट्राचे महत्व अधोरेखित करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युनायटेड किंगडममधील संस्था आणि उद्योजकांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले.

गुंतवणूकदारांचे प्रकल्प वेगाने पुढे नेण्यासाठी 'इन्व्हेस्ट महाराष्ट्र' व्यासपीठाच्या माध्यमातून सर्व संबंधित यंत्रणांशी तातडीने समन्वय साधला जाईल. यूके मधील सचिव, महापौर व अधिकारी यांचा हा दौरा केवळ औपचारिक भेट नसून दोन्ही देशांमधील महत्वाकांक्षेचे प्रत्यक्ष व्यवसाय आणि करारांमध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

हॉटेल ताज पॅलेस येथे आयोजित महाराष्ट्र-यूके भागीदारी शुभारंभ कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अनबळगण, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, युनायटेड किंगडमचे व्यवसाय, नवोन्मेष, विज्ञान आणि व्यापार राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स उपस्थित होते.

यूकेच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळासोबत झालेल्या द्विपक्षीय चर्चानंतर विविध महत्वाच्या क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्यासाठी महाराष्ट्र आणि यूके दरम्यान झालेल्या सामंजस्य कराराचे आदान प्रदान करण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबई आंतरराष्ट्रीय वित्त, व्यापार आणि उद्योजकतेला जागतिक



बाजारपेठांशी थेट जोडते. पुणे हे अभियांत्रिकी, वाहन उद्योग, उत्पादन आणि माहिती तंत्रज्ञानाचे प्रमुख केंद्र बनले आहे. राज्यभरातील कुशल मनुष्यबळ, सक्षम औद्योगिक समूह आणि जागतिक ग्राहकांना सेवा देणाऱ्या अनुभवी भागीदारांचे मजबूत जाळे ही महाराष्ट्राची ताकद आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे परदेशी विद्यापीठांना महाराष्ट्रात कॅम्पस सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे. 'युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिस्टल', 'युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क' आणि 'युनिव्हर्सिटी ऑफ ?बर्डिन' यासारखी जागतिक विद्यापीठे महाराष्ट्रात येत आहेत. राज्यात उभारण्यात येणाऱ्या एज्युसिटी, मेडिसिटी आणि एआय इनोव्हेशन सिटीमुळे जागतिक दर्जाचे संशोधन, संस्था आणि प्रतिभा एकत्र येतील.

महाराष्ट्रात औद्योगिक कार्बन उत्सर्जन कमी करणे, ऊर्जा कार्यक्षमता, पाणी व्यवस्थापन, वाहतूक आणि साधनसंपत्तीचे पुनर्नवीकरण यासारख्या स्वच्छ ऊर्जा प्रकल्पांना मोठा वाव आहे. जागतिक कॉर्पन्यांना त्यांची 'ग्लोबल कॉर्पोबिलिटी सेंटर्स' आणि तंत्रज्ञान संशोधन केंद्रे महाराष्ट्रात उभारण्यासाठी राज्य शासन पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील स्थानिक उत्पादक, अन्नप्रक्रिया उद्योग, तंत्रज्ञान कंपन्या आणि लघुउद्योजकांना ब्रिटनमध्ये नव्या बाजारपेठा व ग्राहक मिळविण्याची संधी उपलब्ध होईल. येत्या काळात महाराष्ट्र आणि ब्रिटनमधील संबंध करारांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष उद्योग, व्यवसाय आणि रोजगारनिर्मितीतून अधिक दृढ होतील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स म्हणाले, यूकेच्या ज्या कंपन्या भारतीय बाजारपेठेत प्रवेश करू इच्छितात, त्यांच्यासाठी महाराष्ट्र हे सर्वात नैसर्गिक आणि योग्य ठिकाण आहे. या राज्याची निवड त्याच्या स्पष्ट आर्थिक ताकदीमुळे, राजकीय स्थैर्य आणि नेतृत्वामुळे केली आहे. राज्याची अर्थव्यवस्था ही युरोपमधील नॉर्वे देशापेक्षाही मोठी आहे. महाराष्ट्रात केवळ एका कागदावर स्वाक्षरी करण्यासाठी आलेलो नाही, तर आम्हाला प्रत्यक्ष परिणाम आणि यश हवे आहे. दोन्ही बाजूंच्या लोकांनी एकत्र येऊन हे काम पुढे न्यावे आणि दोन्ही देशांच्या प्रगतीला गती द्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी यूकेमधील स्कॉटलंडचे पर्यावरण, अन्न आणि ग्रामीण व्यवहार सचिव डेम ॲन्ड्रुआ ईगल, राज्य सचिव डग्लस अलेक्झांडर, ईयू आणि आंतरराष्ट्रीय व्यापारचे संचालक सोफी ब्राईस, दक्षिण आशियासाठी यूकेचे उप-व्यापार आयुक्त हरशबीर संघा, इंग्लंडचे दक्षिण आशियासाठी व्यापार आयुक्त आणि पश्चिम भारतासाठी ब्रिटनचे उप-उच्चायुक्त हरजिंदर कांग, महापौर आदी उपस्थित होते.

अनर्थ टळला.. बजाज चौकात झाडाची मोठी फांदी कोसळली

काही सेकंदांपूर्वीच पाच ते सहा जण उभे होते



वर्धा : शहरातील गजबजलेल्या बजाज चौकात मुडके बुक स्टॉलजवळ असलेल्या झाडाची मोठी फांदी अचानक सायंकाळच्या सुमारास कोसळली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. मात्र, काही सेकंदांपूर्वीच याच ठिकाणी पाच ते सहा जण उभे होते. ते बाजूला गेल्यानंतरच फांदी कोसळल्याने मोठा अनर्थ टळला.

केळीच्या हातगाडीचे नुकसान

बजाज चौक हा नेहमीच नागरिकांच्या वर्दळीचा परिसर आहे. मुडके बुक स्टॉलजवळ नागरिकांची ये-जा सुरू असतानाच झाडाची मोठी फांदी अचानक खाली कोसळली. या घटनेमुळे परिसरात काही काळ घबराट निर्माण झाली. फांदी कोसळल्याने जवळील केळी विक्रेत्याच्या हातगाडीचे नुकसान झाले.

काही सेकंदांचा फरक आणि मोठा अनर्थ टळला! झाडाखाली उभे असलेले नागरिक काही क्षणांपूर्वीच तेथून बाजूला झाल्याने जीवितहानी टळली. शहरातील वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या जुन्या आणि धोकादायक झाडांच्या फांद्यांची वेळीच छाटणी करण्याची गरज या घटनेने अधोरेखित झाली आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणेने अशा झाडांची तातडीने पाहणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनीक्षेपक व डीजे चालक-मालकांची बैठक

नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाईचा इशारा

वर्धा : नवरात्र उत्सव तसेच इतर सण, उत्सव व धार्मिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे आणि ध्वनी प्रदूषणास प्रतिबंध करणे या उद्देशाने वर्धा जिल्ह्यातील ध्वनीक्षेपक, लाऊडस्पीकर, अ?म्प्लिफायर, डीजे व इतर ध्वनी निर्माण करणाऱ्या उपकरणांचे चालक व मालक यांची बैठक पोलीस अधीक्षक कार्यालय, वर्धा येथे पार पडली. अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात आली.

बैठकीस पोलीस उपअधीक्षक (गृह) प्रमोद मकेश्वर, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महादोक, ठाणेदार वर्धा शहर, सेवाग्राम व रामनगर, सावंगी, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, सपोनि जिल्हा विशेष शाखा तसेच जिल्ह्यातील डीजे व ध्वनीक्षेपक चालक-मालक उपस्थित होते. यापूर्वी ५ सप्टेंबर रोजी पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत ध्वनीक्षेपक व डीजे चालक-मालकांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यात आले होते. तथापि, गणेशोत्सवाच्या कालावधीत हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीत ध्वनी प्रदूषणासंदर्भात दोन गुन्हे दाखल झाले. या पार्श्वभूमीवर संबंधितांनी ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २०००, सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालयाचे आदेश, जिल्हादंडाधिकारी यांचे १७ सप्टेंबर २०२६ अन्वये ध्वनी प्रदूषण नियमाचे पालन बाबत व लेझर लाईट प्रतिबंध आदेश जारी करण्यात आला आहे व कलम ३६ व ३८ (१) मपोका नुसार १९ सप्टेंबर २०२६ अन्वये आणि शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

ध्वनीक्षेपकाचा वापर विहित आणि प्रशासकीय आदेशांचे काटेकोर पालन करावे अशा सूचना यावेळी देण्यात आल्यात.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध प्रचलित कायद्यानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा बैठकीदरम्यान देण्यात आला. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा जिल्हा पोलीस प्रशासनाने सर्व सण-उत्सव शांततेत, उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पाडण्यासाठी नागरिक, उत्सव मंडळे तसेच डीजे व ध्वनीक्षेपक चालक- मालकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे ही सामूहिक जबाबदारी असून, नागरिकांचे आरोग्य, शांतता आणि सुरक्षितता लक्षात घेऊन सर्वांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन वर्धा जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

ध्वनीमर्यादेत आणि शासनाने निर्धारित केलेल्या वेळेतच करावा. आवश्यक त्या सक्षम प्राधिकाऱ्यांचा परवानग्या प्राप्त केल्याशिवाय ध्वनीक्षेपकाचा वापर करू नये. शांतता क्षेत्र, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये तसेच इतर संवेदनशील ठिकाणांच्या परिसरात विशेष दक्षता घ्यावी. ध्वनीची तीव्रता वाढविण्यासाठी अतिरिक्त किंवा नियमबाह्य साउंड सिस्टींमचा वापर करू नये. वाहनांवर ध्वनीक्षेपक व इतर उपकरणे बसविताना वाहनाची सुरक्षितता धोक्यात येणार नाही, याची दक्षता घ्यावी. नागरिकांना त्रास होईल किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, अशा पद्धतीने ध्वनीक्षेपक, डीजे व इतर ध्वनी निर्माण करणाऱ्या उपकरणांचा वापर करू नये. ध्वनी प्रदूषणासंबंधी लागू असलेल्या नियमांचे, न्यायालयीन निर्देशांचे

वर्धा पोलिसांची बायपास मार्गावर स्टंटबाजी व वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम

६३ वाहनचालकांवर कारवाई; ६३ चलान केसेस दाखल; ५० हजार ५०० रुपयांचा दंड



वर्धा : वर्धा शहरालगतच्या बायपास मार्गावर स्टंटबाजी करणाऱ्या तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध वर्धा पोलिसांनी विशेष मोहीम राबविली. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवणे, रस्ते अपघातांना आळा घालणे आणि नागरिकांचा प्रवास सुरक्षित करणे या उद्देशाने दतपूर ओव्हरब्रिज, जुनापाणी ओव्हरब्रिज, हिंदी विद्यापीठ ओव्हरब्रिज, सावंगी मेघे लोखंडी ओव्हरब्रिज, शांतीनगर आणि नागठाणा ओव्हरब्रिज या ठिकाणी 'जीवन सुरक्षा अभियान' अंतर्गत विशेष तपासणी करण्यात आली. या मोहिमेत उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महादोक, वर्धा वाहतूक नियंत्रण शाखेचे प्रभारी अधिकारी विजयकुमार घुले, पोलीस उपनिरीक्षक अमोल लगड तसेच वाहतूक अंमलदार सहभागी झाले होते.

रस्त्यांवर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने उभी केलेली अवजड वाहने, ट्रिपल सीट प्रवास करणारे दुचाकीस्वार, हेल्मेट न वापरणारे दुचाकीचालक, स्टंटबाजी करणारे वाहनचालक, सीटबेल्ट न लावणारे चारचाकीचालक आणि इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात आली.या कारवाईदरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध एकूण ६३ चलान केसेस दाखल करून ५० हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला.वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्यांवर करण्यात येणाऱ्या कारवाईचा उद्देश केवळ दंड वसूल करणे हा नसून वाहनचालकांमध्ये शिस्त निर्माण करणे आणि सर्व नागरिकांचा प्रवास सुरक्षित करणे हा आहे. अपघातांना प्रतिबंध घालण्यासाठी नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.दरम्यान, वर्धा शहरालगतच्या बायपास मार्गावरील दतपूर, जुनापाणी, हिंदी विद्यापीठ, सावंगी मेघे, शांतीनगर आणि नागठाणा परिसरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही नियमितपणे कारवाई करण्यात येणार आहे.

राज्यातील ३०४ तालुके दुष्काळग्रस्त घोषित – मंत्री मकरंद जाधव पाटील

पिकांच्या नुकसानीची मदत स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर होणार

मुंबई : राज्यातील ट्रिगर-१ आणि ट्रिगर-२ लागू झालेल्या एकूण ३०४ तालुक्यांना अंतिमतः दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहे. या तालुक्यांमध्ये दुष्काळी उपाययोजना आणि विविध सवलती लागू करण्यात येणार असून, पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने सुरू करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती मदत व पुर्नवसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.

मदत व पुनर्वसन विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. खरीप हंगाम २०२६ मधील पर्जन्यमानातील तूट आणि अन्य संबंधित घटकांचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी ट्रिगर-१ लागू झालेल्या २६५ तालुक्यांना २६ सप्टेंबर २०२६ रोजी दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले होते. आता ट्रिगर-१ आणि ट्रिगर-२ च्या आधारे आणखी ३९ तालुक्यांचा नव्याने समावेश केल्याने एकूण ३०४ तालुके अंतिमतः दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत.

दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये १२ उपाययोजना व सवलती

दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये शेतकरी आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाने १२ विविध उपाययोजना लागू करण्याचा निर्णय घेतला होता. या योजनांनाचा लाभ नव्याने समावेश करण्यात आलेल्या ३९ तालुक्यांना देखील लागू होणार आहे. यामध्ये जमीन महसूलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कर्जवसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या चालू वीजबिलात सूट आणि शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी यांचा समावेश आहे.

तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे अधिकाधिक सुरू करण्यासाठी निकषांमध्ये शिथिलता आणणे, आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, टंचाई जाहीर केलेल्या गावांतील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांची वीजजोडणी खंडित न करणे, शेतकरी व शेतमजुरांसाठी अन्नधान्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था करणे, जलसंधारणाची कामे सुरू करणे आणि पिण्याचे पाणी व जनावरांच्या पाण्याचे योग्य नियोजन करणे, अशा उपाययोजना करण्यात येणार आहेत.

पिकांच्या नुकसानीची मदत स्वतंत्र निर्णयाने

अंतिमतः दुष्काळग्रस्त घोषित केलेल्या ३०४ तालुक्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने पंचनामे सुरू करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. सर्वेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शविणारी छायाचित्रे आणि जीपीएस कोऑर्डिनेट संकलित करून पिकांच्या परिस्थितीचा अहवाल कृषी आयुक्तांमार्फत शासनाला तातडीने सादर करण्यात येणार आहे.

पिकांच्या नुकसानीबाबत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात येणारी आर्थिक मदत विहित कार्यपद्धती पूर्ण करून स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर केली जाणार आहे. दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत असून, दुष्काळग्रस्त भागातील पाणी, चारा, रोजगार आणि शेतीसंबंधित समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्यावर भर दिला जाणार आहे, असेही मंत्री जाधव पाटील यांनी सांगितले.

दुष्काळ जाहीर झालेले जिल्ह्यानिहाय तालुके खालीलप्रमाणे

पालघर- जव्हार, मोखाडा, तलासरी (तीन), रायगड- श्रीवर्धन (एक), रत्नागिरी- रत्नागिरी, संगमेश्वर, राजापूर, लांजा, मंडणगड, खेड(सहा), सिंधुदुर्ग- सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली, कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड, वेंगुर्ला (आठ), नाशिक- मालेगाव, बागलाण, कळवण, नांदगाव, सुरगाणा, इगतपुरी, पेठ, सिन्नर, येवला, देवळा, त्र्यंबकेश्वर, चांदवड, निफाड (१३), धुळे- धुळे, साक्री, सिंदखेडा, शिरपूर (चार), जळगाव- एरंडोल, पारोळा, धरणगाव, चोपडा, पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव, अमळनेर, रावेर, चाळीसगाव, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल (१५), नंदुरबार- अक्कलकुवा, शहादा, नंदुरबार, नवापूर, तळोदा, अक्राणी (सहा), अहिल्यानगर- अहिल्यानगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपूर, राहता (१४), पुणे- भोर, वेल्हे, खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर, आंबेगाव, जुन्नर (१०), सोलापूर- उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा (११), सांगली- मिरज, आटपाडी, जत, कवठेमहांकाळ, शिराळा, वाळवा, खानापूर, तासगाव, कडेगाव, जळगाव जामोद, संग्रामपूर, चिखली, देऊळगाव राजा, मेहकर, बुलढाणा, सिंदखेड राजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापूर, मोताळा, नांदुरा (१३), अमरावती- अमरावती, भातकुली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगाव सुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरूड, मोर्शी, चांदूर बाजार, दर्यापूर (१४), अकोला- अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मूर्तिजापूर, बाळापूर, बार्शीटाकळी (सात), वाशिम- वाशिम, रिसोड, मालेगाव, मंगरूळपीर, कारंजा, मानोरा (सहा), यवतमाळ- यवतमाळ, बाभूळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मारेगाव, झरी जामणी, केळापूर, घाटंजी, राळेगाव (१६), वर्धा- वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, आष्टी, कारंजा (आठ), नागपूर- नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा, उमरेड, कुही, नरखेड, नागपूर शहर (१४), भंडारा- भंडारा, पवनी, लाखांदूर, मोहाडी, तुमसर (पाच), गोंदिया- तिरोडा, आमगाव, देवरी, सालेकसा, गोंदिया, अर्जुनी मोरगाव, सडक अर्जुनी, गोरेगाव (आठ), चंद्रपूर- चंद्रपूर, भद्रावती, गोंडपिंपरी, राजुरा, कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभीड, सिंदेवाही, पोंभुर्णा, जिवती, ब्रह्मपुरी, बल्लारपूर (१५) आणि गडचिरोली- गडचिरोली, चामोर्शी (दोन)

पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश



पलूस (१०), सातारा- सातारा, खटाव, माण, फलटण, खंडाळा, महाबळेश्वर, पाटण, जावळी, वाई, कोरेगाव, कराड (११), कोल्हापूर- पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, आजरा, चंदगड, शाहूवाडी, शिरोळ (आठ), छत्रपती संभाजीनगर- छत्रपती संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर, गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड, फुलंब्री (नऊ), जालना- बदनापूर, घनसावंगी, अंबड, जालना, परतूर, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद (आठ), बीड- बीड, गेवराई, माजलगाव, केज, अंबाजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी (११), लातूर- लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर, चाकूर, रेणापूर, शिरूर अनंतपाळ, देवणी, जळकोट (१०), धाराशिव- धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर, लोहारा, परंडा, उमरगा (आठ), नांदेड- नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलूर, किनवट, हिमायतनगर, माहूर, धर्माबाद, उमरी, अर्धापूर, नायगाव, मुदखेड, मुखेड (१६), परभणी- पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ, जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी (नऊ), हिंगोली- हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव, वसमत (पाच), बुलढाणा-